सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २२ • अंक ०३ • जून २०२६ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## शेतकरी अन्नदाता आहे, तो ऊर्जादाता, इंधनदाता व्हावा - ना. नितीन गडकरी







## साखर व जैवउर्जा परिषद यशस्वी



## राज्याचे नवे सहकार धोरण लवकरच

– सहकार आयुक्त दीपक तावरे



## नाशिक सहकार भारती व राणी भवन आयोजित पापड महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद


स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
तुमच्या बचतीत वाढ करा
10.10%*
व्याजदर
9.00%
1 ते 2 वर्षे
10.00%
2 ते 3 वर्षे
10.10%
3 ते 5 वर्षे
• किमान गुंतवणूक ₹ 1,000 व अधिक • ज्येष्ठ नागरिकांसाठी 0.5% जास्त व्याज (६० वर्षांवरील)
ठेवींवर नवीन व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून लागू | *केवळ सभासदांसाठी. *नियम व अटी लागू
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org
संपर्क : ९०२२१ ७३५९७
30 वर्षे | 213 शाखा | 4 राज्य | 12000 कोटी ठेवी
MULTIPURPOSE SERVICES
LIFE INSURANCE
GENERAL INSURANCE
MUTUAL FUND
DSA LOANS
GOLD LOAN
LIFE INSURANCE
MUTUAL FUND SCHEMES
THE BEST LOANS FOR YOUR BIGGEST NEEDS!
8.50%
सोने तारण कर्ज योजना
लोकमान्य



राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र. नं. 819
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
६ जुन
शिव राज्याभिषेक सोहळा निमित्त
सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!
तसेच
२६ जुन
राजर्षी शाहू महाराज
यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन..!
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. २००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था.
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ७५ हजार महिलांना २५० कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
६. १०५ कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
MOBILE बँकिंग
DEPOSITE सुविधा
LOAN सुविधा
CORE बँकिंग
NET बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
एक खाते, दुहेरी फायदा
बचत + पेन्शन
तुमचे सध्याचे बचत खाते आता पेन्शन खात्याची सुविधाही देईल.
टीजेएसबी सहकारी बँक लि. चे बचत खाते उघडा
आणि पेन्शनसाठी सुरक्षित व सुविधाजनक बँकिंग अनुभवा.
www.tjsb.bank.in | 022-48897210

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!



- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

netwin
Ideas to Life

नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.

- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!

०२५३ ६६५ १५००

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

sales@netwinindia.in www.netwin.in

# आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...

**चारचाकी...**
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
**जनसेवा कर्ज !**





आपल्या आवडत्या
**टू व्हिलरसाठी**
किफायती
**कर्ज फक्त जनसेवेचे !**

स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
**स्वत:चे घर,**
ठेवा विश्वास
**जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !**





**करा जगाची सफर !**
**जनसेवा आहे हमसफर !**

**जनसेवा पर्यटन कर्ज**

• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी

**संपर्क : 8485871252**
www.janasevabankpune.net

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय :**
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध


ISBN : 978-81-940842-0-4

जून २०२६ (वर्ष २२, अंक ०३)



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**वर्गणीचे दर**

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/– फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/– फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**QR कोड**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name**

**A/c Name :**
**Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**


**सहकार सुगंध कार्यालय**

**ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,**
**५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर,**
**गणेशमळा, सिंहगड रोड,**
**पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३**
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com



**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक –** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004.
**Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# ग्रामीण सहकार आणि साखर उद्योग

महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जडणघडणीत साखर उद्योगाला विशेष स्थान आहे. राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासाचा विचार केला, तर शेती, सहकार आणि साखर उद्योग हे एकमेकांशी अतूटपणे जोडलेले आहेत. ऊस उत्पादक शेतकरी, सहकारी साखर कारखाने, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शासनाची विविध धोरणे यांचा परस्पर संबंध महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे साखर उद्योगाचा विचार केवळ एका कृषी-आधारित उद्योगाच्या मर्यादेत न करता, तो ग्रामीण परिवर्तनाचा आणि शेतकरी सक्षमीकरणाचा केंद्रबिंदू म्हणून करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात सहकार चळवळीने विशेषत: ग्रामीण भागात नवे आर्थिक क्रांतीपर्व सुरू केले. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील यांसारख्या नेतृत्त्वाने सहकारी साखर कारखान्यांची संकल्पना रुजवली. या कारखान्यांनी केवळ साखर उत्पादनच केले नाही, तर गावोगावी रोजगार निर्माण केला. सहकारामध्ये शिक्षणसंस्था, बँका, पतसंस्था, दूध संघ यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम उभारून ग्रामीण विकासाला चालना दिली गेली आहे. सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून हजारो शेतकरी हे या उद्योगाचे भागीदार बनले आहेत.

महाराष्ट्र हा देशातील प्रमुख ऊस उत्पादक राज्यांपैकी एक आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि काही प्रमाणात उत्तर महाराष्ट्रात ऊस लागवडीचे मोठे क्षेत्र आहे. ठिबक सिंचन, सुधारित वाण, यांत्रिकीकरण आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामुळे उत्पादकतेत वाढ झाली आहे. ऊस हे नगदी पीक असल्यामुळे शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून त्याकडे पाहिले जाते. मात्र, त्यासाठी पाण्याची मोठी गरज असते. बदलते हवामान, अनियमित पाऊस, दुष्काळी परिस्थिती आणि वाढता उत्पादन खर्च ही मोठी आव्हाने आहेत. खत, मजुरी, वीज, सिंचन आणि वाहतूक खर्चात सातत्याने वाढ होत असल्यामुळे ऊस शेतीचे अर्थकारण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. अशा परिस्थितीत ठिबक सिंचन, जलव्यवस्थापन, कमी कालावधीत येणाऱ्या वाणांचा वापर आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे.

भारतातील साखर उद्योग हा जगातील सर्वाधिक नियंत्रित उद्योगांपैकी एक मानला जातो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण आणि ग्राहकांना साखर वाजवी दरात उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सरकार विविध धोरणे राबवत असते. केंद्र सरकारकडून ऊसासाठी एफआरपी (Fair and Remunerative Price) जाहीर करण्यात येतो. या दरापेक्षा कमी किंमत कारखान्यांना शेतकऱ्यांना देता येत नाही. महाराष्ट्रात अनेक वेळा कारखाने एफआरपीपेक्षा अधिक दर देतात. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळतो. याशिवाय साखर निर्यात धोरण, साठा नियंत्रण, इथेनॉल निर्मितीसाठी परवानगी, बफर स्टॉक योजना आणि अनुदाने अशा विविध माध्यमांतून सरकार नियंत्रण करत असते. जागतिक बाजारपेठेतील किंमती, देशांतर्गत मागणी आणि महागाई यांचा विचार करून अनेक निर्णय घेतले जातात. मात्र, अतिनियंत्रणामुळे कारखान्यांच्या स्वायत्ततेवर मर्यादा येतात आणि अनेकदा बाजारपेठेतील नैसर्गिक स्पर्धेला अडथळे निर्माण होतात, अशी उद्योगक्षेत्राची भावना आहे. त्यामुळे शेतकरी, उद्योग आणि ग्राहक यांच्यात संतुलन राखणारे धोरण आखण्याची आवश्यक आहे.

आजचा साखर उद्योग केवळ साखर उत्पादनापुरता मर्यादित राहिलेला नाही. ऊसाच्या प्रत्येक घटकाचा उपयोग करून मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्याकडे उद्योगाचा कल वाढला आहे. मळीपासून इथेनॉल निर्मिती, बगॅसपासून वीज निर्मिती, प्रेसमडपासून सेंद्रिय खत, बायोगॅस आणि संपीडित बायोगॅस (CBG) उत्पादन, हरित ऊर्जा आणि जैवइंधन निर्मिती यामुळे कारखान्यांना उत्पन्नाचे नवे स्रोत उपलब्ध होत आहेत. तसेच देशाच्या ऊर्जा निर्मितीमध्ये देखील साखर उद्योगाचे योगदान वाढत आहे.



सहकारी क्षेत्राला आधुनिक व्यवस्थापनाची जोड, पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यावसायिक दृष्टीकोन आवश्यक आहे. ऊस शेतीमध्ये पाण्याचा कार्यक्षम वापर, ठिबक सिंचनाचा प्रसार, संशोधन आणि जैवऊर्जेच्या नव्या संधींचा लाभ घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग हा केवळ कारखाने आणि साखरेच्या उत्पादनापुरता मर्यादित विषय नाही. तो ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्राण आहे, सहकार चळवळीचा पाया आहे आणि लाखो शेतकरी कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार आहे. शेतकरी, सहकारी संस्था, खासगी उद्योग आणि शासन यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास महाराष्ट्राचा साखर उद्योग देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि ग्रामीण विकासाला अधिक चालना देईल, यात शंका नाही.

**संपादकीय...**

जय सहकार!

# राज्याचे नवे सहकार धोरण लवकरच जाहीर होणार - सहकार आयुक्त दीपक तावरे



**राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांचा सन्मान करताना आरबीआय संचालक सतीश मराठे, छायाचित्रात डावीकडून भालचंद्र कुलकर्णी, सतीश गंधे तर उजवीकडे अभय माटे आणि उदय पेंडसे.**

**पुणे –** राज्यातील विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर राज्याचे नवे सहकार धोरण जाहीर करण्यात येणार आहे, असे राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी स्पष्ट केले आहे. सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

आरबीआय आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे, सहकार भारती बँक विभागाचे राष्ट्रीय प्रकोष्ठ प्रमुख अभय माटे, संस्थेचे संचालक उदय पेंडसे सहकार वर्धिनी माजी अध्यक्ष सतीश गंधे व्यासपीठावर होते. आयुक्त तावरे यांनी सांगितले की, सहकार धोरणाचे काम अंतिम टप्प्यात असून त्याचे स्वरूप निश्चित झाले आहे. त्यामुळे जून महिन्यात धोरण जाहीर करण्यात येणार आहे. सहकार भारतीच्या कार्याबाबत बोलताना ते म्हणाले, सहकार क्षेत्राला अपेक्षित असणारे कार्यकर्ते सहकार भारतीमध्ये कार्यरत आहेत. परिणामी सहकार भारतीच्या कामामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहकार क्षेत्राला दिशा देण्याचा सकारात्मक प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच प्रशिक्षणाचे काम देखील तितकेच महत्त्वाचे आहे. राज्यातील सहकारातील विविध घटक संस्थांना त्याचा लाभ होतो आहे.

**⁕ राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण केंद्र सुरू होणार –** मराठे यांनी सांगितले की, राज्यस्तरावर जसे प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. त्याप्रमाणे नजिकच्या काळात म्हणजेच महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्राच्या धर्तीवर येत्या दोन ते अडीच महिन्याच्या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने आवश्यक ती तयारी करण्यात येत आहे. या केंद्राच्या माध्यमातून विविध सहकारी संस्थांसाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. आगामी काळात देश आत्मनिर्भर होण्यासाठी बँकांनी नवीन बिझिनेस मॉडेल उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तसेच रोजच्या कामासाठी अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध केले जावे अशी सूचना त्यांनी केली.

**सहकार वर्धिनीचे सहकार भारतीमध्ये विलीनीकरण झाल्याची घोषणा करताना सहकार वर्धिनीचे अध्यक्ष सतीश गंधे यांनी यापुढे आमची सर्व टीम सहकार भारती प्रशिक्षण संस्थेच्या कार्यात सक्रीयपणे सहभाग घेईल, असे सांगितले. त्यांच्या सुमारे १०० सभासदांना सहकार भारती प्रशिक्षण संस्थेचे सभासदत्त्व देण्यात आले आहे.**

**⁕ प्रत्येक राज्यात सहकारी संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे –** सहकार भारतीच्या आजवरच्या कार्याची आणि वाटचालीची माहिती देऊन ते म्हणाले, सहकार क्षेत्रात देशातील सर्वात मोठी अशासकीय संस्था एन्‌जीओ अशी संस्था असून देशातील प्रत्येक राज्यात संस्थेचे जाळे विस्तारले आहे देशातील प्रत्येक राज्यात म्हणजेच ग्रामीण भागात सुमारे ७० टक्के पेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे संपूर्ण जगाचा विचार करता केवळ भारतातच सहकारी संस्थाचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे. तसेच देशातील ४० कोटींपेक्षा आधिक जनता सहकारी संस्थांशी निगडित आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे केंद्राच्या वतीने तयार करण्यात आलेल्या सहकार मंत्रालयामुळे सहकार क्षेत्राला नवीन दिशा मिळाली आहे.

**⁕ प्रशिक्षण संस्थेसाठी सर्वांनी योगदान द्यावे –** माजी अध्यक्ष गंधे यांनी सहकार वर्धिनी आणि सहकारी प्रशिक्षण संस्था यांच्या विलीनीकरणाबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच यापुढील काळात प्रशिक्षण संस्थेसाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. संचालक पेंडसे यांनी आभार मानले.



सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी स्वागत करून स्नेहमेळावा आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली आणि सूत्रसंचालन केले. तसेच पाहुण्यांचा परिचय करून दिला राज्याच्या विविध भागातून सहकार क्षेत्रातील कार्यकर्ते परिषदेत सहभागी झाले होते.




**'विस्मा'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साखर आणि जैव उर्जा परिषदेचे उद्घाटन, दीपप्रज्वलनाने करताना राज्यपाल हरिभाऊ बागडे डावीकडून साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, महासचिव पांडुरंग राऊत आणि बी.बी. ठोंबरे.**

# शेतकरी अन्नदाता आहे, तो ऊर्जादाता, इंधनदाता व्हावा - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

**पुणे –** शेतकरी हा अन्नदाता आहे पण यापुढील काळात तो ऊर्जादाता, इंधनदाता व्हावा, यासाठी साखर कारखान्यांनी केवळ साखर उत्पादनावर भर न देता उपपदार्थ निर्मितीवर अधिक भर द्यावा, अशी सूचना केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी केली आहे.

साखर आणि जैव ऊर्जा या विषयावर एक दिवासीय परिषदेचे आयोजन वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, महासचिव पांडुरंग राऊत कार्यकारी संचालक अजित चौगुले उपस्थित होते. यावेळी विस्माच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

**※ इथेनोल प्रमाण वाढविण्यावर भर –**

गडकरी म्हणाले, इथेनॉलची निर्मिती विविध बार्बीपासून करण्यात येत आहे. भविष्यात पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढविण्यावर अधिक भर दिला जाणार असून त्याबाबत सरकार विचार करीत आहे. तसेच १०० टक्के इथेनॉल कसे करता येईल त्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे सध्या काही भागात इथेनोल विक्री करणारे पंप सुरू आहेत त्याचप्रमाणे सर्व प्रकारची वाहने इथेनॉलवर चालावीत असा प्रयत्न आहे. देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी कृषी आणि ग्रामीण विकास यावर अधिक भर देण्याची गरज आहे आणि त्याचा मुख्य कणा हा साखर उद्योगाशी जोडला आहे. सध्या आयातीचे प्रमाण कमी करून निर्यातीवर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. सध्याच्या काळात आपण इंधन आणण्यासाठी भर देतो आहोत, ते कमी केल्यास स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे, असे ते म्हणाले.

**※ साखर कारखाना चालविणे अवघड झाले –**

सध्याच्या काळात साखर कारखाना चालविणे अवघड झाले आहे असे

**पुढील पानावर...**

## पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण ३० टक्के करण्याबाबत विचार सुरू – राज्यपाल बागडे



**पुणे –** मध्यंतरीच्या काळात इथेनॉलचा वापर पूर्णपणे बंद होता म्हणजे जवळपास दहा वर्ष तसे झाले नसते तर आज आपण खूप पुढे गेलो असतो. आज एका बाजूला कारखान्यांनी गाळप क्षमता वाढविली. मात्र त्या तुलनेत उस उत्पादन किती प्रमाणात वाढले हंगामाचा कालावधी कमी होत आहे, साखर उतारा कमी झाला आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण ३० टक्के करावे याबाबत गांभीर्याने विचार सुरू आहे, अशी माहिती राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सांगितली.

ते म्हणाले, देशातील जमीन वाढीस मर्यादा असल्यामुळे पिकांच्या वाढीस मर्यादा आहेत. तसेच राज्यातील उस गाळप हंगामाचा कालावधी कमी झाला आहे, तो अधिक काळ चालावा यासाठी उसाचे उत्पादन वाढण्याची गरज आहे. त्यादृष्टीने साखर उद्योगाने उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच गाळप हंगाम लवकर सुरू झाला तर त्याचा परिणाम साखर उताऱ्यावर होण्याची शक्यता असते तसेच काळाची गरज ओळखून इथेनॉल निर्मिती विविध माध्यमातून करण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.




**'विस्मा'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या साखर आणि जैव उर्जा परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, डावीकडून खासदार सोनावणे, बी.बी. ठोंबरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यपाल हरिभाऊ बागडे आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील आणि महासचिव पांडुरंग राऊत.**

**मागील पानावरून...**

नमूद करून ते म्हणाले, यातून मार्ग काढण्याची गरज आहे. विविध बबीपसून इथेनॉल तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने सरकारमध्ये विचार सुरू आहे. काही भागात इथेनॉलवर पंप सुरू आहेत. त्यामुळे प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच दुचाकी आणि चार चाकी वाहनासाठी इथेनॉल अधिकाधिक वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. नव्याने इथेनॉल इंजिन तयार करण्याबाबत संबधित कंपन्यांबरोबर चर्चा सुरू आहे. तसेच आगामी काळात हवाई इंधन तयार करण्याबाबत विचार सुरू आहे, असे त्यांनी सांगितले.

**सन २००३ मध्ये खाजगी कारखान्यांची संख्या महाराष्ट्रात केवळ ५ होती. पण सध्याच्या स्थितीत ही संख्या १३८ पर्यंत वाढली आहे. साखरेच्या बरोबरीने उपपदार्थ निमितीवर कारखान्यांचा भर असल्याची माहिती सांगण्यात आली.**

**⁕ नवीन तंत्रज्ञान उपपदार्थ निर्मितीवर भर हवा –**

सहकार मंत्री पाटील म्हणाले की, साखर उद्योगाच्या क्षेत्रात यापुढील काळात नवीन तंत्रज्ञान, त्याचप्रमाणे उपपदार्थ निर्मितीवर अधिक भर देण्याची गरज आहे. केवळ साखर उत्पादनावर अवलंबून राहता येणार नाही. पेट्रोलमध्ये यापुढील काळात २५ ते ३० टक्के इथेनॉल मिश्रणाची परवानगी मिळावी अशी मागणी त्यांनी केली.

**⁕ साखर निर्यातीबाबत दीर्घकालीन धोरणाची गरज –**

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे उपाध्यक्ष वळसे पाटील यांनी गेल्या काही वर्षातील साखर उद्योगाच्या स्थितीचा आढावा घेतला. ते म्हणाले, साखर निर्यातीबाबत दीर्घकालीन धोरणाची गरज आहे. तसेच इथेनॉल दरात वाढ करण्यात यावी आणि ऊसाची एफआरपी आणि एमएसपी यामधील तफावत कमी करण्यात यावी. यावेळी त्यांनी साखर उद्योगासमोरील अडचणी मांडल्या. त्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना केली. सध्या उस गाळप क्षमता वाढली, पण त्या तुलनेत उस



वाढला आहे का? एआयच्या वापरामुळे भविष्यात ऊसाचे एकरी उत्पादन वाढणे शक्य आहे असे तज्ञ सांगत आहेत. यापुढील काळात किमान १६० दिवस हंगाम सुरू राहिला पाहिजे पण प्रत्यक्षात १०० दिवस सुरू राहत आहे. त्यामुळे अडचणी वाढत आहेत. यंदा पावसाचे प्रमाणं कमी राहील असा अंदाज आहे असे नमूद करून ते म्हणाले, हे लक्षात घेता कारखान्यांनी तयारी करायला हवी. साखर उद्योगामधून जवळपास ५५ ते ६५ हजार कोटीची उलाढाल होत असते अशी माहिती त्यांनी सांगितली.

साखर आयुक्त डॉ. कोलते यांनी राज्यातील ऊस गाळप हंगामाचा आढावा घेतला. ते म्हणाले, राज्यात सध्या १५६ युनिट्स इथेनॉल उत्पादन क्षेत्रात तर सहवीज निर्मिती क्षेत्रात १२९ युनिट्स कार्यरत आहेत. यामध्ये सहकारी आणि खासगी कारखान्यांचा समावेश आहे. जैव उर्जा आणि जैव इंधन याबाबत साखर आयुक्त कार्यालयाच्या वतीने प्रस्ताव तयार करण्यात आला असून शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

**⁕ शेतकरी, ग्रामीण भागाचा विकास हे उद्दिष्ट –**

प्रास्ताविक करतांना विस्माचे अध्यक्ष ठोंबरे यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीची माहिती सांगितली. ते म्हणाले, सध्या खासगी साखर कारखान्यांच्या माध्यमातून ५५ टक्के साखर उत्पादन, ६५ ते ७० टक्के वीज आणि इथेनॉल निर्मिती करण्यात येत आहे. सहकारी आणि खासगी कारखाना असा कोणताही भेद नाही तर शेतकरी आणि ग्रामीण भागाचा विकास हे उद्दिष्ट ठेवून संस्था कार्यरत आहे. गेल्या काही वर्षात साखर उद्योग हा दोलायमान स्थितीत आहे. सन २००० नंतर या क्षेत्रात उपपदार्थ निर्मितीवर भर देण्यात आला आहे. सन १९९५ मध्ये इथेनॉल निर्मिती सुरू केली. मात्र त्यामध्ये खंड पडला असे त्यांनी स्पष्ट केले.

या परिषदेमध्ये विशेष पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये दालमिया भारत शुगर

**पुढील पानावर...**




**'विस्मा'च्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्यपाल हरिभाऊ बागडे आणि अन्य मान्यवर.**

**मागील पानावरून...**

(कोल्हापूर), जागृती शुगर (लातूर), नॅचरल शुगर (धाराशिव), श्रीनाथ म्हस्कोबा कारखाना (दौंड, पुणे), श्री गुरुदत्त शुगर (कोल्हापूर) आणि दौंड शुगर (पुणे) यांचा समावेश आहे. तर वरिष्ठ अधिकारी श्रेणीमध्ये सर्वश्री शहाजी गायकवाड (दौंड शुगर), संतोष कुंभार (दालमिया भारत शुगर), तुषार निघुते (वेंकटेश्वरा शुगर), वसंत शिंदे (केजीएस शुगर), बी. जी. चव्हाणके (जयवंत शुगर), शशिकांत निगुत (नॅचरल शुगर) आणि शिवाजी शिंदे (सिद्धी शुगर) यांना सन्मानित करण्यात आले.

साखर आणि ऊसापासून तयार करण्यात येणाऱ्या सहपदार्थांची निर्मिती, ग्रीन हायड्रोजन, हवाई इंधन याबाबतचे संशोधन, तसेच पेट्रोल, डिझेल, जैव इंधन निर्मिती, आणि एआय तंत्रज्ञानाचा साखर उद्योग क्षेत्रातील उपयोग अशा विविध विषयांवर चर्चा आणि सादरीकरण करण्यात आले.

महाराष्ट्र तसेच अन्य राज्यांतून खाजगी साखर कारखान्यांचे पदाधिकारी या परिषदेत सहभागी झाले होते. तसेच परिषदेच्या बरोबरीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण आणि माहिती उपलब्ध करून देणारे स्टॉल्स होते. प्रतिनिधींनी स्टॉल्सला भेटी देऊन नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून घेतली.

# देशातील साखर उद्योग क्षेत्राला अधिक बळकट करण्यासाठी स्वतंत्र बहुराज्यीय सहकारी सोसायटी उभारणार

## - केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे सूतोवाच




**पुणे –** देशातील साखर उद्योग क्षेत्राला अधिक बळकट करण्यासाठी स्वतंत्र बहुराज्यीय सहकारी सोसायटी उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितली.

राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाने वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेत विविध राज्यातील साखर कारखानदार यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, देशातील ३०० सहकारी साखर कारखाने यामधून ५० लाख शेतकऱ्यांचा शेतीमधील उसाचे गाळप होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेले साखर कारखाने आर्थिक, तांत्रिक आणि पर्यावरण विषयक अडचणी यास सामोरे जात आहेत. त्यांना सक्षम करण्यासाठी बहुराज्यीय सोसायटी स्थापन करण्यात आली आहे. यामधून साखर कारखान्यांच्या चक्रीय अर्थव्यवस्थेला बळकटी मिळून उस शेतीला आधार मिळणार आहे.

सहकार हा राज्याचा विषय असला तरी शेतकरी वर्ग व ग्रामीण अर्थव्यवस्थेला मदतीच्या हेतूने केंद्राने सहकार मंत्रालय स्थापन केले या मंत्रालयाने आजवर सहकार क्षेत्राच्या हिताचे १३३ निर्णय घेतले. ७० हजार विविध कार्यकारी सोसायटी संगणकीकरणाची प्रक्रिया सुरू केली. आगामी काळात सहकार क्षेत्राला मनुष्यबळाची गरज भासेल, त्यासाठी गुजरातमध्ये स्वतंत्र सहकार विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे.

सहकार क्षेत्रात साखर कारखान्यांची भूमिका महत्त्वाची असून त्यासाठी बहुराज्यीय सोसायटी स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतला, असे ते म्हणाले. यावेळी सहकार मंत्रालयाचे संयुक्त सचिव रमण कुमार, गुजरात, कर्नाटक, आणि महाराष्ट्रातील साखर कारखान्यांचे पदाधिकारी आणि कार्यकारी संचालक उपस्थित होते.

# सहकार क्षेत्र अधिक गतिमान करणार - सहकार आयुक्त दीपक तावरे




**नागपूर** – महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला उज्वल परंपरा लाभली आहे. हाच वारसा पुढे नेत राज्याचे सहकार क्षेत्र अधिक गतिमान करण्याचा संकल्प केला असल्याचे राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे यांनी सांगितले. सहकार भारती नागपूर महानगर व जिल्ह्याच्या वतीने आयोजित सहकार संवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे, विभागीय सहनिबंधक प्रवीण वानखेडे, विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) सदानंद उईके, जिल्हा उपनिबंधक अजय कडू, सहकार भारतीच्या प्रदेश उपाध्यक्ष नीलिमा बावणे, विभाग प्रमुख संजय रोकडे व्यासपीठावर होते.

**❊ सहकार क्षेत्र गतिमान करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर –**

महाराष्ट्राचे सहकार क्षेत्र अधिक गतिमान करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत असे नमूद करून ते म्हणाले. शासनाने राबवलेल्या नव्या यंत्रणेमुळे हे क्षेत्र पारदर्शी होण्यास मदत मिळेल राज्यातील सहकारी संस्थांना अधिक मजबुती प्रदान करण्यासाठी नियमांमध्ये सुद्धा बदल करणार आहोत. महाराष्ट्रात सहकारी पतसंस्थांचे विस्तीर्ण जाळे आहे पतसंस्थांना नवी ऊर्जा देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. पतसंस्थांची देशाच्या व समाजाच्या आर्थिक विकासात मोलाची भूमिका आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व पतसंस्था अधिक सक्षम कशा होतील, यादृष्टीने प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. शासन व प्रशासन सर्व सहकारी संस्थांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील असे आश्वासन आयुक्त तावरे यांनी दिले.

**❊ सहकार धोरणाच्या माध्यमातून सहकारी संस्थांना नवी दिशा –**

जुगादे यांनी सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी सहकार भारतीची व्यापक भूमिका मांडली. संस्कारीत कार्यकर्त्यांची फळीच या सहकार क्षेत्राला नव्या उंचीवर ठेवू शकते. त्यामुळे सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व सहकारी संस्थांनी प्रामाणिकपणे व पारदर्शी पद्धतीने कार्य केले पाहिजे. राज्याच्या नव्या सहकार धोरणाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व सहकारी संस्थांना नवी दिशा मिळणार असून सहकार भारतीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या समस्यांचे निराकरण होणार आहे.

सहकारी पतसंस्थांच्या बाबतीत कर्जविषयक धोरणांमध्ये बदल करून सहकार आयुक्तांनी या क्षेत्राला अधिक बळकटी प्रदान केली आहे. राज्यातील पतसंस्थांच्या ठेवींना विमा संरक्षण देण्यासाठी भारतीय रिझर्व बँकेच्या धर्तीवर कमीत कमी प्रीमियम घेऊन विमा संरक्षण द्यावे. पतसंस्थेत काम करणारे दैनिक अभिकर्ता यांच्या कमिशनचा प्रश्नसुद्धा पतसंस्थेचे हित जोपासूनच सोडवावा, असे ते म्हणाले

प्रास्ताविक प्रदेश उपाध्यक्षा बावणे यांनी तर संचालन सहकार भारतीचे नागपूर जिल्हाध्यक्ष नंदू कन्हेर यांनी केले. सहकार भारतीचे नागपूर महानगर अध्यक्ष घनश्याम कुकरेजा, महामंत्री किरण रोकडे, महिला प्रमुख कविता खापरे सोनाली मेहर, प्रदेश पदाधिकारी नाना महल्ले अंजली मुळे, वासुदेव सुरजुसे यांच्यासह सहकार भारतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळणार घरबसल्या

**चंद्रपूर** – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि 'कृषी ३६०' यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी बांधवांसाठी अत्याधुनिक डिजिटल पीक कर्ज प्रणालीचा शुभारंभ येथे उत्साहात पार पाडला. या डिजिटल उपक्रमामुळे पारंप रिक कर्ज प्रक्रियेला फाटा मिळणार असून, पीक कर्ज प्रक्रिया अधिक जलद, सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होणार आहे.

शेतकरी बांधवांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घरबसल्या सेवा मिळतील आणि त्यांचा वेळ व श्रम दोन्हींची बचत होईल. यावेळी बँकेच्या माहितीपूर्ण नियमावली पुस्तिकेचे तसेच बँकेच्या अत्याधुनिक नवीन संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. बँकेच्या सर्व सेवा डिजिटल स्वरूपात ग्राहकांसाठी अधिक सुलभ होतील.

जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (चंद्रपूर) जयसिंग ठाकूर, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक तृणाल फुलझले, उपाध्यक्ष संजय डोंगरे, मानद सचिव आवेश खान पठाण आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर उपस्थित होते.

# खामगाव अर्बन बँकेला बेस्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट पुरस्कार प्रदान

**खामगाव** – येथील खामगाव अर्बन बँकेला नुकतेच बेस्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट या राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशन आणि क्रेप्ट इन्फोमीडिया यांच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने २१०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. तसेच बँकेच्या ११ शाखात एटीएम सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याखेरीज बँकेच्या वतीने ग्राहकांसाठी विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. बँकेचे अध्यक्ष डॉ. विजय पुंडे आणि उपाध्यक्ष म्हणून डॉ. सतीश कुलकर्णी काम पाहत आहेत.

# भारताचा साखर उद्योग सध्या संवेदनशीलतेच्या टप्प्यावर

**देशातील ऊसाचा गाळप हंगाम नुकताच संपला. साखर उत्पादन त्याचबरोबर साखर उद्योगासमोरील विविध प्रश्न याबाबतचा घेतलेला आढावा...**

भारताचा साखर उद्योग सध्या एका संवेदनशील टप्प्यातून जात आहे, जिथे शेतकरी, ग्राहक, साखर कारखाने आणि देशाचा वाढता जैवइंधन (बायोफ्युएल) कार्यक्रम या सर्वांचे हित जपण्यासाठी धोरणात्मक निर्णय अत्यंत काळजीपूर्वक आणि समतोल साधून घेतले जात आहेत. गेल्या काही वर्षांत, या क्षेत्राचा केवळ एक पारंपरिक साखर-निर्मिती उद्योग यापलीकडे जाऊन हळूहळू विस्तार झाला आहे; आणि आता इथेनॉल मिश्रणाद्वारे (blending) ते भारताच्या ऊर्जा सुरक्षेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे.




**प्रकाश नाईकनवरे**
**एमडी, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ**
**नवी दिल्ली**
**९२०५३ ७७५५४**


साखर हंगाम २०२५-२६ ची सुरुवात सुमारे ५० लाख मेट्रिक टन (LMT) साखरेच्या सुरुवातीच्या साठ्यासह झाली, ज्याचा अखिल भारतीय सरासरी 'एक्स-मिल' (कारखाना स्तर) साखर दर सुमारे ३९.८० प्रति किलो इतका होता. हंगामाच्या सुरुवातीच्या काळात, विशेषतः नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी महिन्यांत, साखरेचे उत्पादन मागील पाच वर्षांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या अधिक राहिले. अनेक राज्यांमध्ये गाळप क्षमता वाढल्यामुळे गाळप प्रक्रियेला गती मिळाली; परिणामी, अनेक साखर कारखाने मार्च महिना उजाडण्यापूर्वीच, अपेक्षेपेक्षा खूप आधी बंद झाले.

या घडामोडींमुळे विशेषतः ५,००० TCD (दररोज गाळप क्षमता) पेक्षा कमी क्षमता असलेल्या मध्यम आणि लहान साखर कारखान्यांवर परिचालन आणि आर्थिक दबाव निर्माण झाला. अनेक प्रदेशांमध्ये, यांत्रिकी पद्धतीने ऊस तोडणी आणि वाढीव गाळप क्षमता यांमुळे, केवळ कारखान्यांचे कामकाज अखंडितपणे सुरू ठेवण्याच्या उद्देशाने उसाची तोडणी अपेक्षेपेक्षा खूप आधीच (अकाली) करण्यात आली. परिणामी, अनेक कारखान्यांमध्ये गाळप हंगाम अचानक संपुष्टात आला; ज्यामुळे कारखान्यांचे प्रत्यक्ष कामकाजाचे दिवस कमी झाले आणि त्यांच्या एकूण आर्थिक व्यवहार्यतेवर (viability) प्रतिकूल परिणाम झाला.

**● वाढीव उत्पादन आणि वाढता आर्थिक ताण –**

चालू हंगामात, गाळप प्रक्रियेत ५४१ साखर कारखान्यांनी सहभाग घेतला, तर मागील वर्षी ही संख्या ५३४ कारखान्यांची होती. १५ मे २०२६ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, भारताने सुमारे २७४.६५ LMT साखरेचे उत्पादन केले; तर मागील हंगामातील याच कालावधीत हे उत्पादन २५७.०५ LMT इतके होते - म्हणजेच यात सुमारे १७.६० LMT ची वाढ नोंदवली गेली. उसाचे गाळपही २७६४.६५ LMT वरून वाढून २८७२.५६ LMT इतके झाले, तर साखरेचा सरासरी उतारा (recovery) ९.३०% वरून सुधारून ९.५६% इतका झाला.

केवळ महाराष्ट्राचा विचार करता, साखरेचे उत्पादन गेल्या वर्षीच्या ८०.९० LMT च्या तुलनेत वेगाने वाढून सुमारे ९९.२० LMT इतके झाले. जरी साखरेच्या उताऱ्याची पातळी बऱ्याच अंशी स्थिर राहिली असली, तरी गाळप क्षमतेत झालेल्या प्रचंड वाढीमुळे गाळप हंगामाचा कालावधी मात्र लक्षणीयरीत्या कमी झाला. त्याच वेळी, गाळपाच्या ऐन हंगामात साखरेचा साठा मोठ्या प्रमाणात जमा झाल्यामुळे, साठवणुकीचा खर्च (carrying costs), आणि खेळत्या भांडवलासाठी घेतलेल्या कर्जांवरील व्याजाचा बोजा लक्षणीयरीत्या वाढला. तथापि, वाढत्या उत्पादन खर्चाच्या प्रमाणात साखरेच्या किमतींमध्ये वाढ झाली नाही.

या हंगामात, अखिल भारतीय स्तरावरील साखरेचे सरासरी 'एक्स-मिल' (कारखाना स्तरावरील) दर सातत्याने घसरत गेले:

* ऑक्टोबर २०२५ - ३९.२१/किलो
* नोव्हेंबर २०२५ - ३८.६८/किलो
* डिसेंबर २०२५ - ३७.८०/किलो
* जानेवारी २०२६ - ३७.४३/किलो
* फेब्रुवारी २०२६ - ३८.४५/किलो
* मार्च २०२६ - ३८.४५/किलो

साखरेचा सध्याचा सरासरी विक्री दर (realization) सुमारे ३८ ते ३९.८० प्रति किलो इतका आहे; हा दर साखरेच्या अंदाजित उत्पादन खर्चापेक्षा (जो आता ४१ ते ४२ प्रति किलोपेक्षा जास्त झाला आहे) लक्षणीयरीत्या कमी आहे. या तफावतीमुळे साखर कारखान्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागले असून, संपूर्ण साखर उद्योगामध्ये 'तरलता तणाव' (liquidity stress) वाढला आहे.

**● निर्यात धोरणे आणि बाजार स्थिरीकरणाचे प्रयत्न –**

साखरेच्या अतिरिक्त उपलब्धतेचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि बाजारातील स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी, अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने या हंगामात निर्यातीशी संबंधित काही उपाययोजना लागू केल्या.

सुरुवातीला, सरकारने नोव्हेंबर २०२५ मध्ये १५ लाख मेट्रिक टन (LMT) साखरेच्या निर्यातीस परवानगी दिली होती. तथापि, आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेच्या दरांचे प्रतिकूल समीकरण आणि निर्यातीचा आर्थिकदृष्ट्या कमी असलेला फायदा (export economics) यामुळे, निर्यातीची गती अपेक्षेप्रमाणे कायम राहिली नाही.

त्यानंतर, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सरकारने '५ लाख मेट्रिक टन साखर निर्यात योजने'अंतर्गत एका 'पर्यायी निर्यात कोटा यंत्रणे'ची (Alternative Export Quota Mechanism) अधिसूचना जारी केली. या धोरणांतर्गत, साखर कारखान्यांना इतर निर्यात न करणाऱ्या कारखान्यांकडून निर्यात कोटा खरेदी न करता किंवा त्यांच्या देशांतर्गत कोटा वाटपाची अदलाबदल न करताच साखर निर्यात करण्याची मुभा देण्यात आली. ही योजना विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरात या राज्यांमधील किनारपट्टीवरील साखर कारखान्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरली; या कारखान्यांच्या वाट्याला निर्यातीचा सुमारे ८७,५८७ टनांचा कोटा आधीच आला होता.

बाजारातील सध्याची परिस्थिती आणि निर्यातीचे आर्थिक समीकरण लक्षात घेता, चालू हंगामातील एकूण साखर निर्यात ८ लाख मेट्रिक टनांपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

गाळप हंगाम नियोजित वेळेपूर्वीच संपल्यामुळे, साखरेचे निव्वळ उत्पादन सुमारे २७९ लाख मेट्रिक टन इतके राहिले; हे प्रमाण साखर उद्योगाकडून यापूर्वी वर्तवण्यात आलेल्या अंदाजापेक्षा कमी होते. उत्पादनातील या घटीचे मुख्य कारण म्हणजे ऊस पिकणाऱ्या काही विशिष्ट प्रदेशांमध्ये निर्माण झालेली प्रतिकूल हवामान परिस्थिती, अपेक्षेपेक्षा कमी आलेले उसाचे उत्पादन (yield), तसेच उसाचे वजन आणि साखरेचे प्रमाण (recovery) या दोन्हीवर परिणाम करणाऱ्या 'फुलोरा-संबंधित समस्या' (flowering-related issues).

याव्यतिरिक्त, अनेक राज्यांमध्ये गाळप क्षमतेत झालेली जलद वाढ आणि त्यासोबतच उसाच्या कापणीसाठी यंत्रांचा वाढता वापर (mechanised harvesting) यामुळे, कारखान्यांचे कामकाज अखंडपणे सुरू ठेवण्याच्या

**पुढील पानावर...**

मागील पानावरून...

# भारताचा साखर उद्योग सध्या संवेदनशीलतेच्या टप्प्यावर

उद्देशाने उसाची कापणी आणि गाळप नियोजित वेळेपूर्वीच (अकाली) करण्यात आले. ऊस पूर्णपणे पक्व होण्यापूर्वीच (optimum maturity) मोठ्या प्रमाणात कच्च्या उसाची कापणी करण्यात आली; याचा साखरेचे प्रमाण (recovery) आणि एकूण साखर उत्पादन या दोन्हीवर प्रतिकूल परिणाम झाला.

या सर्व घटकांमुळे अनेक साखर कारखान्यांमध्ये- विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांमध्ये- गाळप हंगाम अचानक आणि नियोजित वेळेपूर्वीच बंद करावा लागला. परिणामी, गाळप प्रक्रियेचा एकूण कालावधी कमी झाला आणि चालू हंगामातील साखरेचे अंतिम उत्पादन मर्यादित राहिले. पुरवठ्याची तुलनेने घट्ट परिस्थिती पाहता, हंगाम अखेरचा साठा समाधानकारक राखण्यासाठी, देशांतर्गत पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि साखरेच्या देशांतर्गत किमतींमध्ये होणारी अचानक वाढ टाळण्यासाठी साखर निर्यातीबाबत सावध भूमिका घेतली जात असल्याचे दिसते. भारत सरकारने अचानक साखर निर्यातीवर बंदी घातली. यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरातसारख्या बंदर-आधारित राज्यांमधील साखर कारखाने पूर्ण गोंधळात आणि वाढत्या आर्थिक तणावाखाली सापडले आहेत. खरे तर, साखर क्षेत्राच्या दीर्घकालीन स्थिरतेसाठी आणि आंतरराष्ट्रीय साखर व्यापारात भारताची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी कायम स्वरूपी निर्यात धोरणे महत्त्वाची आहेत.




**• इथेनॉलचे वाढते महत्त्व –**

अलीकडील वर्षांतील सर्वात महत्त्वपूर्ण संरचनात्मक घडामोडींपैकी एक म्हणजे 'जैवइंधन राष्ट्रीय धोरणा'अंतर्गत (National Policy on Biofuels) भारताच्या इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाचा झालेला जलद विस्तार.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली, भारताने २०% इथेनॉल मिश्रणाचे (blending) उद्दिष्ट, पूर्वी निश्चित केलेल्या कालमर्यादेच्या खूप आधीच यशस्वीरित्या साध्य केले आहे. देशातील इथेनॉल उत्पादन क्षमता आता वार्षिक २००० कोटी लिटरच्या पुढे गेली आहे; यामध्ये धान्य-आधारित आणि ऊस-आधारित अशा दोन्ही प्रकारच्या कच्च्या मालाचा समावेश आहे. यामुळे साखर उद्योगासाठी महसुलाचा एक मोठा पर्यायी स्रोत निर्माण झाला आहे.

चालू हंगामात, सुमारे २५ लाख मेट्रिक टन (LMT) साखरेचा वापर इथेनॉल उत्पादनासाठी वळवण्यात आला. यामुळे इथेनॉल पुरवठा वर्ष (ESY) २०२५-२६ दरम्यान-३० एप्रिल २०२६ पर्यंतच्या कालावधीत- साखर-आधारित कच्च्या मालापासून सुमारे १८१ कोटी लिटर इथेनॉलचे उत्पादन झाले. या कालावधीत एकूण इथेनॉल पुरवठ्यामध्ये साखर-आधारित इथेनॉलचा वाटा सुमारे ३५% इतकाच राहिला आहे.

इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाची खालील बाबींमध्ये महत्त्वाची भूमिका राहिली आहे:

✻ साखरेचा अतिरिक्त साठा कमी करणे,

✻ साखर कारखान्यांची आर्थिक तरलता (liquidity) सुधारणे,

✻ उसाची देणी वेळेवर देण्यासाठी मदत होणे आणि

✻ आयात केलेल्या कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करून भारताची ऊर्जा सुरक्षा बळकट करणे.

तथापि, आता ऊस-आधारित इथेनॉल उत्पादकांसाठीच्या वाटपामध्ये (allocation) होत असलेल्या कपातीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. 'इथेनॉल मिश्रित पेट्रोल' (EBP) कार्यक्रमामध्ये साखर-आधारित इथेनॉलचा वाटा, पूर्वीच्या ९०% पातळीवरून घसरून चालू वर्षात ३०% पेक्षा कमी झाल्याचे दिसून येत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे धान्य-आधारित डिस्टिलरीजचा वाढलेला सहभाग आणि तेल विपणन कंपन्यांनी (OMCs) केलेले कमी वाटप हे होय.

त्याच वेळी, उसाच्या 'एफआरपी'मध्ये (FRP) झालेली लक्षणीय वाढ आणि वाढता परिचालन खर्च (operational costs) असूनही, ऊस-आधारित इथेनॉलच्या खरेदी दरांमध्ये गेल्या ४ वर्षांत कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. यामुळे, साखरेच्या विक्रीतून मिळणाऱ्या दरांच्या (realizations) घसरणीचा सामना करणाऱ्या साखर कारखान्यांवर आणखीनच आर्थिक ताण वाढला आहे.

असे असले तरी, इथेनॉलबाबतचा दीर्घकालीन दृष्टीकोण अत्यंत आशादायक आहे. ए२२, ए२५, ए२७ आणि ए३० यांसारख्या उच्च प्रमाणात इथेनॉल मिश्रित इंधनांसाठी 'BIS मानके' नुकतीच अधिसूचित करण्यात आली आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, भारताची इंधन अर्थव्यवस्था (fuel economy) आगामी वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने उच्च मिश्रणाच्या पातळ्यांकडे वाटचाल करत आहे.

**• साखरेच्या किमान विक्री किमतीमध्ये** (MSP) **सुधारणेची आवश्यकता –**

आज साखर उद्योगासमोर उभी असलेली एक प्रमुख समस्या म्हणजे उसाचे दर आणि साखरेच्या विक्रीतून मिळणारे दर (realizations) यांच्यातील वाढती तफावत. साखर हंगाम २०२६-२७ साठी उसाचा 'वाजवी आणि किफायतशीर भाव' (FRP) १०.२५% साखर उताऱ्याशी (recovery) संलग्न करून, ३६५० प्रति टन इतका वाढवण्यात आला आहे. साखरेचा किमान विक्री भाव (MSP) अखेरचा सुधारित करून ३१ प्रति किलो करण्यात आला, तेव्हापासून FRP २,७५० प्रति टनावरून वाढून ३,६५० प्रति टन झाली आहे - ही जवळपास २३% वाढ आहे.

उसाच्या दरांसोबतच, तोडणी, वाहतूक, इंधन, रसायने, कामगार आणि वित्तपुरवठा यांशी संबंधित खर्चही लक्षणीयरीत्या वाढले आहेत. परिणामी, आगामी हंगामासाठी साखर उत्पादनाचा खर्च ४३ प्रति किलोपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे.

तथापि, देशांतर्गत साखरेच्या विक्रीतून मिळणारा परतावा (realizations) हा उत्पादन खर्चापेक्षा खूपच कमी राहिला आहे. या परिस्थितीमुळे रोखतेवरील ताण (liquidity stress) वाढला आहे, कर्जाची आवश्यकता

पुढील पानावर...



# साखरेवरील निर्यात बंदी केंद्र सरकारने उठवावी – हर्षवर्धन पाटील यांची मागणी

**पुणे –** केंद्र सरकारने साखरेवरील निर्यातबंदी तातडीने उठवावी, कारण अनेक साखर कारखान्यांनी करार केले आहेत. तसेच निर्यातीच्या दृष्टीने नियोजन केले आहे. काहीचे कंटेनर प्रवासात आहेत. निर्यात बंदीच्या निर्णयामुळे कारखान्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, त्याचप्रमाणे देशातील साखर उद्योगासमोरील विविध समस्यांची स्दोडवणूक करण्यासाठी देशस्तरावर स्वतंत्र समिती असावी, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे.



महासंघाच्या वतीने एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. बैठकीला राज्याच्या विविध भागातील ६० प्रतिनिधी उपस्थित होते. साखर उद्योगांसमोरील विविध अडचणींवर विचार करून निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी, अशी मागणी बैठकीत करण्यात आली आहे, असे ते म्हणाले.

केंद्र सरकारच्या निर्णयाबाबत बोलताना ते म्हणाले, सुरूवातीला ८ ते १० लाख टन साखर निर्यात करण्यात येणार होती. त्यात आणखी ५ लाख टन वाढ करण्यात आली आहे पण साखर निर्यात न झाल्यास साखरेच्या दरात घसरण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कारखानदारी समोरच्या समस्या वाढतील. परिणामी साखर उद्योग अडचणीत येणे शक्य आहे. म्हणून केंद्र सरकारने निर्णयात बदल करावा असे ते म्हणाले. सध्या देशामधून ६ ते ७ देशांमध्ये साखर निर्यात करण्यात येत आहे. केवळ साखर निर्यातीबाबत नाही तर एकूणच साखर उद्योगासाठी किमान १० वर्षांचे नेमके धोरण असायला हवे, त्यामध्ये सलग बदल केले जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**✲ साखरेच्या मागणीत घट –**

देशातील साखरेची मागणी घरगुती आणि व्यावसायिक स्तरावर कमी कमी होत आहे. याबाबत गांभीर्याने सरकारने विचार करावा अशी मागणी त्यांनी केली. ते म्हणाले, एका बाजूला देशातील लोकसंख्या वाढत असताना साखरेची मागणी कमी होत आहे. सध्या साखरेचा एफआरपीचा दर आणि देशातील साखरेचा दर एकच आहे हे पाहता भविष्यात देशाला साखर आयात करण्याची वेळ येऊ नये. देशभरात सुमारे २७० लाख टन साखर उत्पादन होऊन देखील मागणी कमी होत आहे.

**✲ इथेनॉल दर, सहवीज निर्मिती दर बाबत नेमके धोरण असावे –**

इथेनॉल दर, सहवीज निर्मिती दर याबाबत नेमके धोरण ठरवले जावे असे नमूद करून ते म्हणाले, देशाचा विचार करता इथेनॉल उत्पादनात सुमारे १ लाख कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात आली आहे, हे लक्षात घेता इथेनोलची किंमतीत वाढ करण्यात यावी. तसेच साखर उद्योगाला किमान ५० टक्के कोटा मिळावा, त्याचप्रमाणे सहवीज निर्मितीबाबत नेमके दर आणि धोरण असायला हवे, याबाबत राज्य शासन आणि केंद्र सरकारने सामान्य तोडगा काढावा असे ते म्हणाले.

**✲ साखर उताऱ्यात अल्प वाढ –**

देशामध्ये यंदा एकूण ५४१ सहकारी साखर कारखान्यांनी गळप हंगाम घेतला आणि २८७२ लाख टन उस गाळप झाले तर २७४ ६५ लाख मे. टन साखर उत्पादन झाले तर ९.५६ टक्के साखर उतारा मिळाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ०.२६ टक्के उतारा वाढला आहे. आगामी देशातील ऊसाचा गाळप हंगाम सुरू करण्यापूर्वी चार महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत. त्यात एफआरपी ऊस तोड पेमेंट, बँक कर्जाची परतफेड आणि कर्मचारी वेतन याचा विचार करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रात नुकत्याच संपलेल्या ऊसाच्या गाळप हंगामात एकूण ९९.१८ लाख टन साखर उत्पादन झाले असून १० कोटी ४५ लाख ५८ हजार टन उसाचे गाळप करण्यात आले आहे. यंदा राज्यात एकूण १०२ सहकारी आणि १०७ खासगी कारखान्यांनी हंगाम घेतला. यंदा राज्यात अपेक्षित प्रमाणात साखर उत्पादन झाले नाही. एकूण १०५ लाख टन उत्पादन अपेक्षित होते पण प्रत्यक्षात ९९ लाख टन झाले आहे तर एकूण १०५ दिवस हंगाम सुरू राहिला.

---

मागील पानावरून...

## भारताचा साखर उद्योग सध्या संवेदनशीलतेच्या टप्प्यावर

वाढली आहे आणि साखर कारखान्यांच्या आर्थिक शाश्वततेवर परिणाम झाला आहे.

म्हणूनच, या क्षेत्रातील भागधारकांना असे वाटते की, सध्याच्या उत्पादन अर्थशास्त्राशी सुसंगत राहून, साखरेचा किमान विक्री भाव (MSP) सुधारित करून तो सुमारे ४३-४४ प्रति किलोपर्यंत नेणे अत्यंत गरजेचे आहे. देशांतर्गत साखरेचे भाव आधीच ३८-३९.८० प्रति किलोच्या आसपास आहेत, त्यामुळे अशा सुधारणेमुळे ग्राहकांवर महागाईचा कोणताही मोठा दबाव निर्माण होण्याची शक्यता नाही.

MSP मध्ये केलेली एक संतुलित सुधारणा खालील बाबी साध्य करण्यास मदत करू शकते:

✲ साखर कारखान्यांची आर्थिक शाश्वतता सुधारणे,
✲ शेतकऱ्यांना उसाचे पैसे वेळेवर मिळण्याची खात्री करणे,
✲ साखरेची 'संकटातील विक्री' (distress sale) कमी करणे, आणि
✲ सरकारच्या वारंवार होणाऱ्या हस्तक्षेपाची गरज कमी करणे.

**● जैव-ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करणारे एक क्षेत्र –**

भारताचे साखर क्षेत्र आता केवळ साखरेवर केंद्रित असलेल्या उद्योगातून, हळूहळू एका व्यापक 'जैव-ऊर्जा परिसंस्थे'मध्ये रूपांतरित होत आहे. साखर, इथेनॉल, स्वच्छ इंधन आणि ऊर्जा सुरक्षा यांशी संबंधित धोरणे अधिकाधिक परस्परांशी जोडली जात आहेत.

या क्षेत्रासमोरचे आव्हान केवळ साखर उत्पादनाचे व्यवस्थापन करणे हे नाही, तर शेतकरी, साखर कारखाने आणि देशाच्या नवीकरणीय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षा - या सर्वांची दीर्घकालीन शाश्वतता एकाच वेळी सुनिश्चित करणे हे आहे.

संतुलित धोरणात्मक पाठिंबा, निर्यातीची निश्चित यंत्रणा, साखरेचे वास्तववादी दर आणि ऊसावर आधारित इथेनॉलसाठी योग्य प्रोत्साहन मिळाल्यास, हे क्षेत्र ग्रामीण उपजीविका, राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक वाढ यामध्ये आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहू शकेल.

✲✲✲✲✲

# 'विकसित भारत २०४७' संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी सहकारातून योगदान देणे आवश्यक



**अविनाश जोशी**
९८१९३ २९७५०

सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारे, केंद्रीय सहकार मंत्रालय स्वतंत्रपणे स्थापित करण्यात आले आहे. सहकार क्षेत्रावर यापुढे राज्य आणि केंद्र सरकार असे दुहेरी नियंत्रण राहणार. सहकारी संस्थांचे सुसूत्रीकरण, सक्षमीकरण करणे, त्यांना प्रशासकीय कायदेशीर व धोरणात्मक संरक्षण देणे, हे या मंत्रालयाचे माध्यमातून साध्य होईल. सहकारातून समृद्धी हाच या नव्या मंत्रालयाचा दृष्टिकोन आहे.

सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या आर्थिक व इतर सर्वच प्रकारच्या संस्थांचा विकास व्हावा, त्या सक्षम व्हाव्यात यासाठी केंद्रीय स्तरावर व राज्य पातळीवर सहकार धोरण तयार करून घोषणाची पूर्तता नवीन मंत्रालयाद्वारे केली जात आहे. सहकारी संस्थाचे संचालन योग्य तऱ्हेने चालवायचे असेल तर त्यासाठी प्रशिक्षित संचालक, अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकता आहे. याचसाठी गुजरातमध्ये त्रिभुवन सहकार विद्यापिठाची स्थापना करण्यात आली आहे. सहकार मंत्रालयाच्या माध्यमांतून केंद्र तसेच राज्य सरकारने सहकार धोरणांची अंमलबजावणी करून 'सहकारातून समृद्धीचे' स्वप्न साकार करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करताना दिसत आहेत.

**✲ सहकारी क्षेत्राचे बळकटीकरणासाठी सरकारचे प्रयत्न –**

सहकारी क्षेत्राचे बळकटीकरणासाठी केंद्र सरकार अनेक धोरणात्मक बदल करीत आहे. पुढील दशक सहकाराचे असेल आणि त्यामध्ये महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची असेल. कारण सहकार चळवळ महाराष्ट्रात रुजली, वाढली आणि फोफावली. सर्वाधिक सहकारी संस्था त्यातही पतसंस्था आणि सहकारी बँका महाराष्ट्रातच आहेत. त्यामुळे नुकतेच जाहीर झालेले 'नवे राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' आणि त्यानुसार लवकरच जाहीर होईल, असे त्यास सुसूत्र असणारे राज्य सरकारचे 'सहकार धोरण' हे महाराष्ट्रातील सहकार चळवळ अधिक समृद्ध व बळकट करण्यासाठी कारणीभूत ठरेल. सन २०४७ मधील विकसित भारत घडवण्यासाठी सहकार क्षेत्राचा फार मोठा वाटा असणार आहे. 'सहकारातून समृद्धीकडे' या संकल्पनेची अंमलबजावणी या नव्या केंद्र व राज्य सरकारचे सहकार धोरणातून होणार आहे. नवे केंद्र व राज्य सरकारचे सहकार धोरण केवळ आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या पतसंस्था व सहकारी बँकांना नव्हे तर सहकारी क्षेत्रातील इतर संस्था म्हणजेच साखर कारखाने, घरबांधणी, गृहनिर्माण संस्था, कुक्कुटपालन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय, विणकर सोसायटी, विविध कार्यकारी सोसायटी यांना आर्थिक सक्षमता देण्याचे काम या धोरणामार्फत होईल. दळणवळण व शेती यांसारख्या क्षेत्रातही सहकारी संस्थांची वाढ व्हावी आणि किमान ५० कोटी जनतेला सहकार क्षेत्राच्या कक्षेत आणण्याचे काम या सहकारी धोरणाचे माध्यमांतून होईल डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, आधुनिक आयटी तंत्रज्ञान आत्मसात केलेला प्रशिक्षित अधिकारी, कर्मचारी वर्ग यासाठीची गरज आहे त्यासाठी गुजरातमधील त्रिभुवन सहकारी विद्यापीठ याची काळजी घेईल.



**✲ युवकांचा सहभाग वाढविणार –**

सहकार क्षेत्रात असणारा असमतोल घालवणे, तरुण पिढीचा सहकारातील सहभाग वाढवणे आणि सहकारी संस्था सशक्त व समृद्ध बनवण्यासाठी त्यांना अधिक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देणे, त्यांचा भांडवली पाया मजबूत करणे यासारखी उद्दिष्टे नव्या सहकार धोरणाचे माध्यमातून साध्य होणार आहेत. याच गोष्टी डोळ्यासमोर ठेवून 'अम्ब्रेला ऑर्गनायझेशन' ही नागरी सहकारी बँकांना अडचणीचे वेळी भांडवल उभारणी, तंत्रज्ञान विस्तार यासाठी मदत करणारी आणि रिझर्व बँक व केंद्र सरकार यांचे पाठबळ असणारी मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यात आली आहे. गैर बँकिंग वित्तीय संस्था (एनडीएफसी) म्हणून नोंदणी झालेली ही संस्था एप्रिल २०२२ मध्ये नॅशनल को–ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशन (एनडीएफडीसी) या नावाने सुरू झाली आहे. या कंपनीमार्फत संचालक अधिकारी व भागधारक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले जाईल. गुंतवणूक व निधी व्यवस्थापन व मार्गदर्शन, तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर याबाबत मार्गदर्शन, रोखता राखण्यासाठी मदत, भांडवल उभारणीसाठी मदत, डाटा सेंटर उभारणी मार्गदर्शन, आर्थिकदृष्ट्या कमजोर बँकांसाठी रिहॅबिलीटेशन, मर्जर यासाठी मार्गदर्शन, सभासद बँकांना रिफायनान्स कर्जपुरवठा व त्यांच्याकडून ठेवी स्वीकारणे यासारखी कामे ही संस्था करेल.

**✲ राज्याचे स्वतंत्र धोरण –**

माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचे अध्यक्षतेखाली समितीने 'नवे राष्ट्रीय सहकारी धोरण' २०२३ मध्ये जाहीर केले. त्यातील शिफारसीनुसार प्रत्येक राज्याने स्वतःचे राज्य सहकारी धोरण तयार करायचे असून त्यासाठी महाराष्ट्र सरकारने सहकार खात्यातील आयुक्त, सहकार क्षेत्रातील अधिकारी यांची एक समिती गठीत केली असून राज्याचे सहकार धोरण तयार करण्याचे काम वेगाने सुरू आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ३२ सदस्य असलेली उच्चस्तरीय समिती गठीत केली असून ६ धोरणात्मक विषयावर उपसमित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या सहा गटातील सदस्यांनी नेमून दिलेल्या विषयांवर राज्यातील सहकारी संस्था संदर्भात संबंधितांशी चर्चा करून राज्याचे सहकार धोरणाबाबत अभिप्राय सादर करण्याचा आहे. यामध्ये संस्थांचा पाया मजबूत करणे, चैतन्यशीलता वाढवणे, संस्थांना भविष्यासाठी सजग करणे, सर्वसमावेशकता आणि सखोलता वाढवणे, नवीन व उदयोन्मुख क्षेत्रामध्ये प्रवेश करणे आणि सहकाराचा विकास व वाढीसाठी तरुण पिढीला पुढाकार देणे, अशा सहा ध्येय स्तंभांवर शिफारसी हे गट करतील. राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांच्या मार्गदर्शनाखाली समिती राज्याचे सहकार धोरण तयार करेल. सर्वच गटांमध्ये सहकारातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या अभ्यासकांचा समावेश असल्याने राज्याचे सहकार धोरण अत्यंत उपयुक्त आणि सहकार क्षेत्राला चालना आणि नवचैतन्य देणारे ठरेल.

**✲ राष्ट्रीय सहकार न्याय प्राधिकरणाची स्थापना –**

केंद्रीय सहकार धोरणानुसार सहकारी संस्थांचे आर्थिक शिस्तीवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय सहकार लेखा व लेखापरीक्षण मंडळ स्थापन केले जाणार आहे. सहकारी संस्थांमधील वादांचे निराकरण लवकर होऊन न्यायदान प्रक्रिया अधिक जलद व्हावी, यासाठी राष्ट्रीय सहकार न्याय प्राधिकरणाची स्थापन करण्यात येणार आहे. याचे दूरगामी परिणाम पुढील काळात सहकारी संस्था सक्षम आणि समृद्ध करण्यामध्ये निश्चितच दिसतील.

**पुढील पानावर...**

# सहकारी संस्था निवडणुकांसाठी ईव्हीएम यंत्रणा – केंद्रीय निवडणूक आयोगाला प्रस्ताव देणार

**पुणे –** देशातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसाठी ईव्हीएम यंत्रणेच्या उपयुक्ततेबाबतचा एक प्रस्ताव केंद्रीय निवडणूक आयोगाकडे पाठविण्याची गरज असून यासाठी विविध राज्यातील सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण सामूहिकपणाने प्रयत्न करणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे यांनी सांगितली.



**अनिल कवडे, राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण आयुक्त**

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले, यापूर्वी महाराष्ट्राचा एक प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र त्याबाबत कोणताही निर्णय झाला नाही. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात दिल्ली येथे एक बैठक झाली. त्यामध्ये या प्रस्तावाबाबत नव्याने चर्चा करण्यात आली. देशातील महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, ओरिसा, तेलंगणा आणि अन्य काही राज्यात प्राधिकरणे कार्यरत असून पुन्हा नव्याने निवडणूक आयोगाला प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे, याबाबत एकमत झाले आहे.

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या खर्चाच्या तपशिलाबाबत सांगताना ते म्हणाले, याबाबत स्वतंत्र प्रणाली तयार करण्यात आली असून त्याची चाचणी सुरू आहे. त्या त्या सहकारी संस्थांचा खर्च वेळेत सादर होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सहकारी संस्थेला खर्चाचा तपशील आणि रक्कम मिळणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता ही तितकीच महत्त्वाची आहे.

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना ते म्हणाले, सध्या २११२ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. त्यामध्ये अ गटात – ५, ब गटात २६७, क गटात – ९४४ तर ड गटात – ८९६ संस्थांचा समावेश आहे. तसेच यापुढील काळात राज्यातील ३६३६ सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामध्ये अ गटात – ३०, ब गटात – ३७२, क गटात – १३७५ आणि ड गटात – १८५९ सहकारी संस्थांचा समावेश आहे.

# कराड अर्बन बँकेचा महाराष्ट्रात विस्तार – रिझर्व्ह बँकेकडून विस्तारास मान्यता

**कराड –** दि कराड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक आता महाराष्ट्रात शाखा विस्तार करण्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि सहकार विभागाने मान्यता दिली आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष समीर जोशी यांनी सांगितली.

सध्या बँकेचे कार्यक्षेत्र आठ जिल्ह्यांत ७२ शाखांद्वारे पसरले आहे. गेल्या दोन वर्षांत नवीन ठिकाणी सुरू केलेल्या शाखांमधून बँकेला ६४५० कोटींचा अतिरिक्त व्यवसाय मिळाला आहे. मार्च अखेर बँकेने ६५०० कोटींचा व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. सलग तीन वर्षे बँकेने निव्वळ एनपीए 'शून्य' टक्के राखण्यात यश मिळवले आहे. गेल्या आर्थिक वर्षात ७५० कोटींची वाढ नोंदवली.

उपाध्यक्ष शशांक पालकर म्हणाले, यूपीआयसारख्या अत्यावश्यक सेवा डिजिटल माध्यमातून देऊन ग्राहकांना सर्व सुविधा एकत्र मिळणार आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल–डिझेल दरवाढ व राष्ट्रीय हित लक्षात घेऊन बँकेने बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकीसाठी ७.७५ टक्के व चारचाकीसाठी ८.२५ टक्के दराने कर्ज योजना जाहीर केली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी सीए धनंजय शिंगटे यांनी सांगितले.

माजी अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी म्हणाले की, शून्य एनपीए कायम राखणे, व्यवसाय वाढीत सातत्य ठेवणे व महाराष्ट्रभर विस्तार करून बँकेचा नावलौकिक वाढविणे हे मुख्य ध्येय आहे. सभासद, ग्राहक व हितचिंतकांच्या इच्छाशक्तीमुळे बँकेस संपूर्ण महाराष्ट्रभर शाखा विस्ताराची संधी मिळाली आहे.

मागील पानावरून...

## 'विकसित भारत २०४७' संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी...

राष्ट्रीय सहकारी धोरण व राज्य सहकारी धोरण हे २०४७ मध्ये विकसित भारत बनवण्याच्या दृष्टीने टाकलेले सकारात्मक पाऊल आहे थोडक्यात 'सहकारातून समृद्धी' हा संदेश घेऊन केंद्र सरकारची राज्य सरकारचे सहकार धोरणाचे माध्यमातून सहकार चळवळीला नवसंजीवनी मिळेल,

**✼ सहकार ही एक उत्तम जीवनशैली –**

सहकार ही एक उत्तम जीवनशैली आहे, त्याचा अंगीकार करून सर्वच क्षेत्रात, विशेषतः ग्रामीण भागाचा उत्तम विकास होऊ शकतो, हे या चळवळीने सिद्ध केले आहे. मात्र ही चळवळ ज्यांचे हातात आहे, त्यांनी उत्तम संस्था संचालन करणे, पारदर्शी आणि प्रामाणिक व्यवहार करणे, विश्वस्त व सेवाभावी वृत्तीने संस्था चालवणे आणि फक्त संस्थेचे हित डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेणे, या गोष्टी हजारो सभासदांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संचालक मंडळाने सतत लक्षात ठेवल्या तरच राष्ट्रीय व राज्याचे सहकार धोरण यशस्वी होईल. नाहीतर सहकाराची जागा स्वाहाकाराने, स्वार्थाने आणि स्वहिताने घेतली तर सहकारी संस्था यशस्वी होणार नाहीत, याची जाणीव संस्था संचालनाची जबाबदारी स्वीकारलेल्या संचालक मंडळ सदस्यांनी सतत ठेवली पाहिजे. म्हणूनच 'विना सहकार, नहीं उद्धार' याचबरोबर 'विना संस्कार, नही सहकार' हे तत्व देखील अंगीकारले पाहिजे.

**✼ सहकारातून 'समृद्धी' शक्य –**

सहकारात काम करणारी मंडळी जर या वृत्तीने सहकार चळवळ चालवतील, तर सहकारातून 'समृद्धी' आल्याशिवाय राहणार नाही. जी नव्या राष्ट्रीय सहकार धोरणाला अभिप्रेत आहे. या धोरणाचे अंमलबजावणीमुळे 'सहकारातून समृद्धीकडे' ही संकल्पना साकारण्यात, सहकाराचे सात मूलतत्त्वांचे पालन करून आर्थिक विकास करण्यात व देशातील सहकारी चळवळीला बळकट करून तळागाळातील लोकांपर्यंत सहकाराची फळे पोहोचवण्यात राष्ट्रीय व राज्य सरकारचे नवे सहकार धोरण निश्चितच यशस्वी होईल.

सहकारातील बँका, पतसंस्था यांसारख्या आर्थिक सेवा क्षेत्राबरोबरच, विविध उद्योगधंदे व सेवा क्षेत्रात सुद्धा सहकारी तत्त्वावर संस्था उभारून देशाचे आर्थिक विकासात त्यांचे योगदान वाढवणे, सहकार धोरणामुळेच शक्य होणार आहे. नवे राष्ट्रीय व राज्याचे सहकार धोरण यशस्वीपणे राबवण्याची जबाबदारी सर्व सहकारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची आहे, यासाठी भरीव योगदान देणे, हे सहकारात काम करणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

सन २०४७ पर्यंत भारताला उच्च उत्पन्न असणारे विकसित राष्ट्र बनण्यासाठी केवळ राष्ट्रीय स्तरावरील धोरणे पुरेशी नसून राज्यांनी आपापल्या स्थानिक बलस्थानानुसार विकास धोरणे आखणे आवश्यक आहे, असे रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता यांनी केले आहे. 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेचे मूर्त स्वरूप देण्यासाठी सहकारी चळवळीचे माध्यमातून आणि धोरणातून आपले योगदान देण्याचा निश्चय करू या.

**– अविनाश जोशी, निवृत्त रिझर्व बँक अधिकारी, व्यवस्थापन समिती सदस्य, वाई अर्बन बँक वाई, जिल्हा सातारा.**

**मो.नं. – ९८१९३ २९७५०**

✼✼✼✼✼

# सहकारी बँका आणि पतसंस्थांना 'सायबर सिक्युरिटी सेंटरची सुविधा' देणार

**राज्य सहकारी बँकेच्या वतीने सहकारी बँकांसाठी नव्याने सायबर सिक्युरिटी सेंटर कार्यरत करण्यात आले आहे. भविष्यकाळात सहकारी बँकांच्या बरोबरीने पतसंस्थांना देखील ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या नवीन सायबर सिक्युरिटी सेंटरबाबत माहिती देणारे वृत्त...**

**पुणे –** राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या जिल्हा बँकेतील व्यवहार अधिक सुरक्षित व्हावेत, यासाठी राज्य सहकारी बँकेने नवी मुंबईतील वाशी येथे सहकार सुरक्षा या नावाने सुसज्ज 'सायबर सिक्युरिटी सेंटर' सुरू केले आहे. यामुळे बँकांच्या सर्व्हरवर होणारे हल्ले रोखण्यास यश येत आहे.

पाच जिल्हा बँका या सुविधेचा वापर करीत आहेत. राज्यातील सर्व जिल्हा बँकांनी या सुविधेचा वापर करावा, असे आदेश सहकार विभागाचे सचिव प्रवीण दराडे यांनी काढले आहेत अशी माहिती, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी पत्रकारांना सांगितली.

**※ देशातील हे पहिलेच सेंटर –**

अशा स्वरूपाची सुविधा उपलब्ध करून देणारे देशातील हे पहिलेच सेंटर आहे असे नमूद करून ते म्हणाले, राज्यातील सर्व जिल्हा सहकारी बँकांनी ही सुविधा रोजच्या कामकाजात वापरात आणावी, यासाठी शासनाच्या वतीने राज्यातील सर्व सहकारी बँकांना सांगण्यात आले आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे देशातील काही राज्यांनी या सुविधेबाबत विचारणा केली आहे. यापुढील काळात सहकारी बँकाच्या बरोबरीने सहकारी पतसंस्थांसाठी ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

**※ देशातील डिजिटल व्यवहार वाढले –**

ते म्हणाले की, मागील काही वर्षात इंटरनेट आधारित डिजिटल व्यवहार वाढले आहेत. आजमितीला देशातील ४२ टक्के व्यवहार डिजिटली होतात. सायबर हल्ल्यांचे प्रमाणदेखील वाढले असून नागरिकांचा पैसा बँकांमध्ये देखील असुरक्षित ठरू पाहात आहे.

राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या जिल्हा बँकेतील पैसे सुरक्षित राहावेत, यासाठी चार वर्षांपूर्वी राज्य सहकारी बँकेने वाशी येथे ४० कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सायबर सिक्युरिटी सेंटर उभारले आहे.

अडीच वर्षांपूर्वी हे केंद्र प्रत्यक्षात सुरू झाले असून येथे ३५ संगणक अभियंते कार्यरत आहेत. राज्य बँकेसह सिंधुदुर्ग, सातारा जिल्हा बँकेसह चार बँकाचे लिस्टिंग झाले आहे तर पुणे जिल्हा बँकेलाही लवकरच ही सुविधा पुरवण्यात येईल. जिल्हा बँकांची शिखर संस्था म्हणून राज्य सहकारी बँक सायबर सिक्युरिटी सेवा जिल्हा बँकांना मोफत देत आहे.

**※ सेंटरमध्ये ५० बँकांना सेवा पुरवण्याची क्षमता –**

राज्यात ३१ जिल्हा बँका असून आतापर्यंत केवळ चारच बँकांनी ही सुविधा घेतली आहे. या सेंटरमध्ये ५० बँकांना सेवा पुरवण्याची क्षमता आहे. वाशी येथे उभारण्यात आलेल्या सायबर सिक्युरिटी सेंटरमध्ये जिल्हा बँकेच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा बँकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सहकारी बँकेकडून अशी सुविधा निर्माण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे, असे ते म्हणाले.



**विद्याधर अनास्कर**
**राज्य सहकारी बँक प्रशासक**

**※ केंद्राची मुख्य उद्दिष्टे –**

राज्य बँक आणि अन्य सहकारी बँकांना ज्ञात आणि अज्ञात अशा दोन्ही प्रकारच्या संभाव्य सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित ठेवणे, सायबर हल्ल्यांचा अगदी सुरुवातीच्या टप्प्यातच शोध घेऊन त्याचे परिणामकारक नियंत्रण करणे आणि बँकांना सूचना देणे, सहकारी बँकांचे नुकसान व्हावे यासाठी केले जाणारे प्रयत्न हाणून पाडणे आणि संरक्षण करणे, एआयवर कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सायबर सुरक्षा प्लॅटफोर्मच्या माध्यमातून आणि सततच्या निरीक्षणातून धोके शोधून बँकाना अलर्ट देणे, बँकांच्या सुरक्षा व्यवस्थेचे मोजमाप करणे आणि त्यांना आवश्यक त्या सूचना देणे, आरबीआय नाबार्ड आणि केंद्र सरकारच्या नियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणेद्वारा बँकांना अहवाल तयार करण्यास मदत करणे, २४ बाय ७ बँकाच्या संगणकीय व्यवस्थेवर लक्ष ठेवणे, संगणकीय माहितीचे एआयच्या माध्यमातून विश्लेषण करणे, संशयित व्यवहार यावर लक्ष ठेवणे आणि भविष्यातील संभाव्य धोके टाळण्यासाठी कार्यक्रमाची आखणी करणे.

**※ भविष्यात केंद्राची क्षमता वाढविणार –**

लहान आणि मध्यम सहकारी बँकांना स्वत:ची कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करून असे केंद्र उभारणे शक्य नाही. हीच अडचण लक्षात घेऊन राज्य सहकारी बँकेने 'सहकारा अंतर्गत सहकार' या तत्त्वाचे पालन करत, कोणताही नफा न घेता ही सुरक्षा प्रणाली सर्व सहकारी बँका व पतसंस्थांना उपलब्ध करून देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला सहकार क्षेत्रातील वाढत्या मागणीनुसार केंद्राची क्षमता अधिक वाढवली जाणार असून, सदस्य बँकांच्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष सायबर सुरक्षा प्रशिक्षण देखील दिले जाईल.

डिजिटल बँकिंगच्या काळात सहकारी बँकिंग क्षेत्राला सुरक्षित कवच देणारे हे पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे ते म्हणाले.



# केंद्रीय सहकार निवडणूक आयोगाच्या कामकाजातील त्रुटी

बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या निवडणुका संचालित करण्याचे काम केंद्रातील सहकार निवडणूक आयोगाकडे आहे. बहुराज्यीय सहकारी बँकांच्या निवडणुकांत नुकतेच घडलेले काही प्रसंग येथे नमूद केले आहेत.

ज्या सहकारी संस्थांना एकाहून अधिक राज्यांत व्यवसाय करण्यास अनुमती मिळाली आहे त्यांना बहुराज्यीय सहकारी संस्था असे म्हणतात. त्यांची नोंदणी 'मल्टि-स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अ‍ॅक्ट'खाली केलेली असते. महाराष्ट्रातील अनेक नागरी सहकारी बँका या प्रकारात येतात. अशा संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणुका घेण्याचे काम, 'को-ऑपरेटीव्ह इलेक्शन ऑथोरिटी' नामक यंत्रणेकडे सोपवले आहे. या आयोगाचे कार्यालय दिल्लीत आहे. आयोगाची राज्यांच्या स्तरांवर स्वतंत्र अशी रचना नाही. त्यामुळे हा आयोग निरनिराळ्या राज्यांतील जिल्हांच्या, जिल्हाधिकारी वगैरे अधिकाऱ्यांमार्फत निवडणुका संचालित करत असतो. निवडणूक अधिकारी म्हणून नेमलेले जिल्हाधिकारी, हे त्यांचे सहाय्यक अधिकारी म्हणून, राज्यांच्या सहकार खात्यांतील अधिकाऱ्यांना नेमत आहेत व त्यांतून या निवडणुकांचे आयोजन होत आहे.



सीए उदय कर्वे
९८१९८६६२०१

**१) निवडणूक कार्यक्रम वेळेत जाहीर न करणे :-**

कायद्याखाली जे नियम बनवले आहेत, त्यांत नियम क्र. १९-एच् असे सांगतो की, ज्या बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची मुदत संपत आली आहे त्या संस्थांनी किमान सहा महिने आधी आयोगाला निवडणूक घेण्याबाबत सूचित करावयाचे आहे. त्यानंतर एक महिन्यात आयोगाने निवडणूक कार्यक्रम तारखांसह जाहीर करावयाचा आहे. म्हणजेच संचालक मंडळ मुदत संपण्यापूर्वी किमान पाच महिने आधी तो जाहीर व्हायला हवा. गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रातील ज्या बहुराज्यीय सहकारी बँकांच्या निवडणुका झाल्या, त्यांत या नियमांची काटेकोर पूर्तता झालेली दिसली नाही.



**२) सभासदांना निवडणूक कार्यक्रमाची माहिती न देणे :-**

नियम १९-एचनुसार निवडणूक अधिकाऱ्याने त्या संस्थेच्या 'प्रत्येक' सभासदाला नियोजित निवडणुकीची तारीख, वेळ, ठिकाणे याबाबत सूचना पाठवली पाहिजे, शक्य असेल अशा प्रत्येक वेळी, त्यांनी ती सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेही पाठवली पाहिजे. बहुराज्यीय सहकारी संस्थांकडे सभासदांचे मोबाइल क्रमांक व ई-मेल आयडीज तपशील असतात. पण प्रत्येक सभासदाला त्या माध्यमांतून निवडणूक कार्यक्रम कळवला जाणे हे होताना आढळत नाही. नुकत्याच झालेल्या काही बहुराज्यीय सहकारी बँकांच्या निवडणुका, या होऊन गेल्यावर त्यांच्या सभासदांना कळत आहेत. जिथे बिनविरोध निवडणुका झाल्या, त्या बव्हंशी ठिकाणी अशी परिस्थिति आहे.

**३) निवडणूक अधिकाऱ्यांना तरतुदी माहीत नसणे :-**

सहकारी संस्थेचे कार्यालय ज्या जिल्ह्यात आहे, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी केंद्रीय आयोगाकडून निवडणूक अधिकारी म्हणून नेमले जाते. त्यासाठी एखादा सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून राज्यांच्या सहकार खात्यातील सहाय्यक निबंधक वगैरे मंडळींची निवड करतात. ही मंडळी केंद्रीय सहकार कायद्याच्या निवडणूक विषयक तरतुदींबद्दल अनेकदा अनभिज्ञ असतात. नुकत्याच झालेल्या एका बँकेच्या निवडणुकीत तर, एका सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्याने निवडणुकीबाबत काही आदेश/सूचना जारी केल्या, पण त्याची त्या कामासाठी नियुक्ती झाल्याचा आदेश मात्र, चक्क त्या नंतरच्या दिवशी पारित झाला होता.

**४) निवडणूक वेळापत्रकाचे पालन न करणे :-**

बहुराज्यीय सहकार कायद्याखालील नियम १९-एम असे सांगतो की, जेवढ्या जागांसाठी निवडणूक आहे तेवढेच वैध अर्ज शिल्लक असतील तर, निवडणूक अधिकाऱ्यांनी, निवडणुकीसाठी बोलावलेल्या सभेत, ती बिनविरोध झाल्याचे जाहीर करावे. पण महाराष्ट्रात नुकतीच असेही उदाहरण घडले आहे की बहुराज्यीय सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध होऊनही कित्येक दिवस निकालच जाहीर होत नव्हते. निकाल जाहीर झाल्यावर अध्यक्ष उपाध्यक्ष यांचेसाठीची निवडणूक प्रक्रियाही रेंगाळली होती. दुसऱ्या एका बँकेत तर अशी परिस्थिति आली की निवडणूक झाली, मतगणना झाली, पण निवडणूक आयोगाकडून, अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीसह नवीन संचालक मंडळाचे गठन झाल्याचे घोषित होईना. काही महत्त्वाच्या कामकाजासाठी संचालक मंडळाने बैठक घेणे तर आवश्यक होते. शेवटी त्या बँकेने तिच्या जुन्याच संचालक मंडळाची बैठक आयोजित केली, ज्याचा कार्यकाळ संपला होता.

**५) अर्ज छाननीबाबत नियमांचे पालन न होणे :-**

एका बहुराज्यीय सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी बरेच अर्ज आले होते. अर्ज छाननीसाठी ते सगळे अर्ज घेऊन जिल्हाधिकारी त्यांच्या कोर्ट रूमसदृश दालनात उच्चासनावर स्थानापन्न झाले. आता एकेक उमेदवारी अर्ज तपासण्यासाठी सुरुवात केली आहे, त्या त्या अर्जांवर कोणाच्या काही हरकती असतील तर त्या सांगाव्यात. त्यावर एका उमेदवाराने सांगितले की, तुम्ही काय तपासताय ते इथून दिसत नाहीये आलेले उमेदवारांचे अर्ज हे सर्व उमेदवारांना बघायलाच मिळालेले नाहीयेत, तर हरकती काय आणि कशा घेणार? अजून एक मुद्दा असा की, आधी सर्वसाधारण गटातील अर्जांची छाननी आहे व म्हणून त्याच गटातील उमेदवारांनी दालनात यावे असे सांगितले यांतील एखाद्या अर्जावर राखीव जागांसाठीचे उमेदवार हरकत कशी घेणार? यांवर गोंधळलेले जिल्हाधिकारी म्हणाले कि, मी छाननी प्रक्रियाच तासाभरासाठी स्थगित करतो. त्यावर एका उमेदवाराने त्यांना सांगितले की, एकदा सुरु केलेली छाननी प्रक्रिया थांबवता येत नाही. असा नियम कुठे आहे? तेव्हा त्या उमेदवारानेच नियम क्र १९-एल् वाचून दाखवला.

**६) बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट माहित नसणे :-**

सहकारी बँकेत ज्या व्यक्ती संचालक पदावर सलग दहा वर्षे कार्यरत आहेत अशांना आता लगेच त्या संस्थेत पुन्हा संचालक होता येत नाही. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांकडून अशा मंडळींचे उमेदवारी अर्ज नाकारले जात आहेत. एका बँकेच्या निवडणुकीत बँकेच्या विद्यमान अध्यक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांची दहाहून अधिक वर्षे झाली असल्याने निवडणूक अधिकारी तो अर्ज मंजूर करत नव्हता. त्यावर अध्यक्षांनी सांगितले की, दहा वर्षांचा नियम बँकांच्या अध्यक्षांना लागू होत नाही. बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्टच्या कलम १०-ए चे वाचन केले तर त्यांचे म्हणणे बरोबर भासत होते. शेवटी अर्ज वैध ठरवला गेला. पण तसे होणे हे

**पुढील पानावर...**




# नाशिक सहकार भारती व राणी भवन आयोजित पापड महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक – नाशिक सहकार भारती आणि राणी भवन यांच्या संयुक्त विद्यमाने पापड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार सीमा हिरे, राज्य सहकारी बँक प्रशासक आणि बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर, सहकार भारतीचे प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, सहकार भारती जिल्हाध्यक्ष अनिता नेरकर, जिल्हा सचिव शिरीष भालेराव, पदाधिकारी आणि कार्यकर्ते, तसेच महिला उद्योजिका यांची उपस्थिती होती.

पापड महोत्सवाला नाशिककरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. पापड महोत्सवात सहकार सुगंध मासिकाचा विशेष स्टॉल उभारण्यात आला होता. स्टॉलला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन माहिती घेतली. उद्घाटन महापौर हिमगौरी आहेर अपूर्वा जाखडी, उद्योजिका, डॉ. डी. एस. गुजराथी, डॉ. प्रशांत पुरंदरे, शुभांगी कुलकर्णी, वृंदाताई लवाटे आदी उपस्थित होते.

महिला सक्षमीकरण करण्यासाठी पाच वर्षांपासून नाशिक जिल्हा सहकार भारतीद्वारा पापड महोत्सव आयोजित करण्यात येतो. जळगाव, भुसावळ, धुळे, पनवेल, नंदुरबार, नाशिक, ग्रामीण तसेच खानदेशी चवींचे पापड स्टॉल होते.

## योगीराज सहकारी पतसंस्था वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे–** येथील योगिराज नागरी सहकारी पतसंस्थेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या कर्मचार्यांना २० हजार कर्मचारी यांना शैक्षणिक अनुदान देण्यात आले. संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकिर यांनी संस्थेच्या वाटचालीची माहिती सांगितली. संचालक रवींद्र घाटे यांनी स्वागत उपाध्यक्ष राजेश विधाते यांनी आभार मानले.

## साधना सहकारी बँक सिंहगड शाखेचे स्थलांतर

**पुणे –** साधना सहकारी बँकेच्या सिंहगड रस्ता शाखेचे स्थलांतर आमदार केतन तुपे यांच्या हस्ते करण्यात आले. माजी स्थायी समिती अध्यक्ष दिलीप तुपे तसेच बँकेचे पदाधिकारी आणि संचालक तसेच खातेदार उपस्थित होते. बँक अध्यक्षा वंदना काळभोर यांनी बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला. आमदार तुपे यांनी काही सूचना केल्या.

मागील पानावरून...

## केंद्रीय सहकार निवडणूक आयोगाचे कामकाज

आयोगाला अपेक्षित नव्हते.

**७) संस्थेच्या पोटनियमांची माहिती अभ्यास नसणे :–**

एका सहकारी बँकेच्या पोटनियमांमध्ये अशी तरतूद आहे की, उमेदवारी अर्जासाठी जे सूचक असतील, त्यांनी त्या बँकेकडून कर्ज घेतलेले असेल तर तो अर्ज बाद होईल. पण अशी तरतूद संबंधित कायद्यात नाहीये. मग त्या मुद्द्यावरून अर्ज बाद करायचा का नाही हे जिल्हाधिकारी यांना उमजेना. हरकत घेणाऱ्यांनी सांगितले की, बँकेचे उपविधी केंद्रीय सहकार खात्याने मंजूर केलेले असल्याने त्यांचीसुद्धा पूर्तता होणे आवश्यक आहे. मग तो अर्ज बाद ठरवला. विविध सहकारी संस्थांच्या पोटनियमांत संचालक पात्रतेसंबंधांत खूपच वेगवेगळ्या तरतुदी असतात.

निवडणूक अधिकाऱ्यांनी एखाद्या संस्थेच्या निवडणुकीसाठी, त्या संस्थेच्या पोटनियमांचा अभ्यास करणे आवश्यक असते, जो अनेकदा केलाच जात नाही. एका बँकेच्या पोटनियमांत अशी तरतूद आहे की, उमेदवार हा किमान दोन वर्षे आधीपासून सभासद असला पाहिजे. ही महत्त्वाची अट पूर्ण न केलेला एक उमेदवार तिथे निवडूनही आला.

असे अजूनही अनेक प्रसंग घडले व घडतही आहेत.

**– उदय म. कर्वे**

**ईमेल – umkarvegmail.com**

**मो. नं. – ९८१९८६६२०१**

**(लेखक सहकार क्षेत्रातील दीर्घानुभवी, सहकार कायद्यांचे अभ्यासक व वैधानिक लेखापरीक्षक आहेत.)**

*****

## राज्य सहकार विकास महामंडळाला राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार प्रदान

**पुणे –** अमरावती येथील राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानच्या वतीने राज्य सहकार विकास महामंडळाला राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी हा पुरस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांच्या हस्ते नुकताच स्वीकारला. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे आणि संचालक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. डॉ. कोलते यांनी सांगितले की, शेतकरी यांच्या उत्पन्न वाढीसाठी महामंडळ कार्यरत आहे. यामधून प्रेरणा घेऊन शेतकरी कंपन्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तिटकारे यांनी प्रास्ताविक तर विभाग प्रमुख दिगंबर साबळे यांनी आभार मानले.

## राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामध्ये नवीन तंत्रज्ञान प्रणाली येणार

**पुणे –** महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या रोजच्या कामकाजात गतीमानता येण्यासाठी इलेक्ट्रिकल फंड मॅनेजमेंट सिस्टिम ही नवीन तंत्रज्ञान प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सध्या या प्रणालीचा प्रयोग हा अमरावती जिल्ह्यातील २५० संस्थामध्ये प्रायोगिक तत्त्वावर करण्यात येत आहे.

नजीकच्या काळात या प्रणालीचा राज्याच्या विविध भागात अवलंब करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने सहकार विभागाने पावले उचलली आहेत. सहकारी संस्थामधील निवडणूक निधीची ऑनलाईन पद्धतीने हाताळणी तसेच सर्व व्यवहारामध्ये पारदर्शकता, गतीमानता, अचूकता आणि प्रणालीमुळे निवडणूक प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या प्रत्येक खर्चाची ऑनलाइन नोंद होणार आहे. तसेच खर्च हा अंतिम अहवाल वेळेत सादर होणार आहे.

# बँकिंगचा नवा चेहरा : तंत्रज्ञान की मनुष्यबळ?

आजची बँकिंग व्यवस्था वेगाने बदलत आहे. पूर्वी बँक म्हणजे ग्राहक, काउंटर, पासबुक, चहा घेत घेत होणारी चर्चा शाखा व्यवस्थापकाचा वैयक्तिक परिचय आणि आपले माणूस अशी भावना. बँकिंगचा चेहरा बदलला आहे – मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, यूपीआय, एटीएम, सीआरएम, एआय आधारित सेवा डिजिटल केवायसी, व्हिडिओ कॉलद्वारे सेवा, चॅटबॉट आणि ऑटोमेशन. प्रश्न असा निर्माण होतो की–बँकिंगचा खरा नवा चेहरा तंत्रज्ञान आहे का मनुष्यबळ? याचे उत्तर सरळ नाही. कारण बँकिंगमध्ये तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ ही दोन्ही चाके आहेत. एक चाक कमी पडले तर गाडी पुढे जाऊ शकत नाही.



व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१

**※ तंत्रज्ञानामुळे आलेली क्रांती –** आज ग्राहकाला प्रत्येक कामासाठी शाखेत जाण्याची गरज उरलेली नाही. पैसे पाठवणे, एफडी करणे, कर्ज हप्ता भरणे, खाते स्टेटमेंट घेणे, विमा प्रीमियम भरणे, अगदी कर्ज अर्जही मोबाईलवर शक्य झाले आहे. आरबीआय आणि एनपीसीआयच्या पुढाकारामुळे भारताने डिजिटल पेमेंटमध्ये मोठी झेप घेतली आहे. यूपीआय व्यवहारांनी भारताला जगात वेगळी ओळख दिली आहे. ग्राहकाचा वेळ वाचतो, शाखेवरील गर्दी कमी होते, ऑपरेशनल खर्च कमी होतो आणि सेवा चोवीस तास उपलब्ध होते. ऑटोमेशनमुळे त्रुटी कमी होतात, रिपोर्टिंग वेगवान होते, कॉम्प्लायन्स मजबूत होते आणि ऑडिट ट्रेल स्पष्ट राहतो. कोअर बँकिंग सिस्टिम, फ्रॉड डिटेक्शन, रिस्क अॅनालिटिक्स आणि मॉनिटरिंग यामुळे व्यवस्थापन अधिक सक्षम झाले आहे. म्हणून तंत्रज्ञान हा पर्याय नाही, तर आजची गरज आहे. पण फेसलेस सर्व्हिस पुरेशी आहे का? बँकिंग हा फक्त व्यवहारांचा व्यवसाय नाही; तो विश्वासाचा व्यवसाय आहे. ग्राहकाला अनेकदा सिस्टीमपेक्षा माणूस हवा असतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, ग्रामीण ग्राहक, शेतकरी, लघुउद्योजक आणि स्वयंरोजगार करणारे ग्राहक – यांना स्क्रीनपेक्षा समोर बसून बोलणारा अधिकारी अधिक विश्वास देतो.

कर्ज मंजुरीच्या वेळी ग्राहकाची मानसिकता, प्रामाणिकपणा आणि व्यवहारातील विश्वासार्हता ही गोष्ट सॉफ्टवेअर पूर्णपणे मोजू शकत नाही. रिकव्हरीमध्येही संवाद, समजावणी आणि मानवी स्पर्श यांची किंमत मोठी असते. एक ग्राहक अडचणीत असताना चॅटबॉट नव्हे, तर सर, काळजी करू नका, आपण मार्ग काढू असे सांगणारा अधिकारी लक्षात राहतो. हीच खरी बँकिंगची माणुसकी आहे.

**※ कर्मचाऱ्यांचे बदलते स्वरूप –** पूर्वी कर्मचारी म्हणजे काउंटर ऑपरेशन, लेजर पोस्टिंग, कॅश हँडलिंग. आज कर्मचारी म्हणजे रिलेशनशिप मॅनेजर, फायनान्शियल अॅडव्हायझर, कॉम्प्लायन्स ऑफिसर, डिजिटल फॅसिलिटेटर आणि प्रॉब्लेम सॉल्व्हर. रूटीन काम ऑटोमेशनकडे गेले, पण निर्णय क्षमता, कस्टमर हँडलिंग, लीडरशिप, कम्युनिकेशन आणि इमोशनल इंटेलिजन्स यांचे महत्त्व वाढले आहे. म्हणून आज फक्त मॅनपॉवर नाही, तर स्किल्ड मॅनपॉवर आवश्यक आहे. ट्रेनिंग हा खर्च नाही; ती गुंतवणूक आहे. डिजिटल बँकिंग, सायबर फ्रॉड अवेअरनेस, डेटा सिक्युरिटी, कस्टमर हँडलिंग आणि रेग्युलेटरी कॉम्प्लायन्स ही नवीन कौशल्ये आवश्यक झाली आहेत. टेक्नॉलॉजी सिस्टिम चालवते, पण संस्था माणसे उभी करतात.

**※ तंत्रज्ञानाचे फायदे आणि धोके –** तंत्रज्ञानाने बँकिंगला वेग, अचूकता आणि विस्तार दिला हे निर्विवाद सत्य आहे. पण प्रत्येक शक्तिशाली साधनांसोबत धोकेही येतात. आज बँकिंग जितके डिजिटल झाले आहे, तितकेच ते बाह्य प्रणालींवर अवलंबून झाले आहे. पूर्वीच्या काळात मॅन्युअल लेजर, पासबुक, हस्तलिखित नोंदी आणि प्रत्यक्ष पडताळणी यावर शाखा चालत असे. वीज नसली इंटरनेट नसले तरी काम पूर्णपणे बंद पडत नसे. आज कोअर बँकिंग, क्लाऊड सिस्टिम्स, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, पेमेंट गेटवेज आणि सेंट्रलाइज्ड सर्व्हर्स यावर संपूर्ण व्यवस्था उभी आहे वीज गेली, सर्व्हर डाउन झाला किंवा नेटवर्क बंद पडले की शाखेत गोंधळ निर्माण होतो. यातून प्रश्न निर्माण होतो – आपण तंत्रज्ञानाचा उपयोग करतो आहोत की त्यावर पूर्णपणे अवलंबून आहोत?

**※ सायबर वॉर – अदृश्य राक्षस –** आजचा सर्वात मोठा धोका म्हणजे सायबर वॉर आणि सायबर अटॅक. पूर्वी युद्ध सीमांवर होत होते; आज युद्ध सर्व्हर रूममध्ये डेटा सेंटरमध्ये आणि नेटवर्कवर होत आहे. रॅन्समवेअर, फिशिंग फ्रॉड, मालवेअर, डेटा थेफ्ट, पेमेंट फ्रॉड आणि आयडेंटिटी थेफ्ट हे बँकिंगसाठी मोठे धोके आहेत. एका सायबर अटॅकमुळे लाखो ग्राहकांचा डेटा धोक्यात येऊ शकतो आणि संस्थेचा विश्वास डळमळू शकतो. अलीकडील जागतिक संघर्षांनी हे दाखवून दिले की इंटरनेट सर्व्हिस, सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्म्स, क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर आणि पेमेंट सिस्टिम्स यांपैकी अनेक गोष्टी काही मोजक्या मोठ्या जागतिक कंपन्यांच्या नियंत्रणात आहेत. जर या सेवा थांबल्या, तर केवळ बँकिंग नव्हे तर संपूर्ण अर्थव्यवस्था ठप्प होऊ शकते. म्हणून तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक आहे; पण सायबर सिक्युरिटी ही लक्झरी नसून नेसेसिटी आहे. फायरवॉल, बॅकअप सिस्टिम्स, डिझास्टर रिकव्हरी प्लॅन, सायबर ऑडिट आणि एम्प्लॉयी अवेअरनेस अत्यावश्यक आहेत.

**※ स्वावलंबनाची गरज –** तंत्रज्ञानासोबत स्वावलंबनाचाही विचार आवश्यक आहे. पूर्ण व्यवस्था बाह्य सॉफ्टवेअर आणि एक्सटर्नल सिस्टीम्सवर उभी असेल, तर संकटाच्या काळात आपली वास्तविक क्षमता किती? बॅकअप मॅन्युअल कंट्रोल्स, ऑफलाइन कंटिजन्सी प्लॅनिंग आणि ऑपरेशनल कंटिन्यूइटी यावर पुन्हा विचार करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाने वेग दिला, पण जुनी पद्धत स्थैर्य देत होती. पूर्वी बँकिंग हळू होते, पण थांबत नव्हते आज बँकिंग वेगवान आहे, पण सिस्टीम फेल्युअर झाला की पूर्ण थांबते. डिजिटल असावे, पण डिपेंडन्ट नसावे. आधुनिक असावे, पण स्वावलंबीही असावे.

**※ विश्वासाची खरी ताकद –** भारतात अनेक बँकांनी टॅगलाईनमधून विश्वास, नाते, आपुलकी, माणुसकी यांना महत्त्व दिले आहे. रिलेशनशिप्स बियॉण्ड बँकिंग गुड पीपल टू बँक विथ, युअर ओन बँक, आपली माणसं, आपुलकीचे नातेनाते विश्वासाचे अशा टॅगलाईन स्पष्ट सांगतात की बँकिंग हा फक्त पैशांचा नव्हे, तर विश्वासाचा व्यवसाय आहे. ग्राहक खाते उघडतो पैशासाठी, पण टिकून राहतो विश्वासासाठी म्हणूनच जुनी बँकिंग पद्धत फेस टू फेस रिलेशनशिपवर उभी होती आणि ती यशस्वीही होती. ग्राहक आणि बँक यांच्यातील नाते हे केवळ व्यवहारांचे नव्हते, तर विश्वास, आपुलकी आणि परस्पर समजुतीचे होते. समोरासमोर बसून झालेला संवाद, अडचणीच्या वेळी दिलेला आधार आणि आपला माणूस ही भावना – यातूनच बँकिंगची खरी ताकद निर्माण होत असे.

बँकेचा नवा चेहरा तंत्रज्ञानाचा आहे, पण तिचे हृदय अजूनही मनुष्यबळातच धडधडते. फेस टू फेस कम्युनिकेशन, विश्वास, नाते, सहानुभूती आणि जबाबदारी यांची जागा कोणतेही अॅप सॉफ्टवेअर किंवा चॅटबॉट पूर्णपणे घेऊ शकत नाही. त्याचवेळी ऑटोमेशन, डिजिटल स्पीड आणि सिस्टीम स्ट्रेंथ यांना नाकारता येणार नाही. धोक्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, पण धोके आहेत म्हणून तंत्रज्ञान नाकारणेही योग्य नाही.

**※ म्हणूनच योग्य मार्ग एकच – बॅलन्स साधणे.**

ऑटोमेशन आणि ह्यूमन टच, स्पीड आणि सेन्सिटिव्हिटी, सिस्टिम आणि संबंध हे दोन्ही सोबत चालले तरच बँकिंग अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि माणुसकीपूर्ण बनेल. हेच खऱ्या अर्थाने भविष्याचे बँकिंग ठरेल.

**– व्यंकटेश कुळकर्णी, प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित पुणे.**

*****




# जळगाव जनता सहकारी बँकेचा 'उत्कृष्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट' पुरस्काराने गौरव

**जळगाव** – सध्याच्या डिजिटल युगात ग्राहकांना सुरक्षित आणि अद्ययावत सेवा पुरवणाऱ्या जळगाव जनता सहकारी बँकेला टियर-३ श्रेणीतील 'उत्कृष्ट आयटी रिस्क मॅनेजमेंट' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट अँड अवॉर्ड्स २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील सहकार क्षेत्रातील २०० हून बँका सहभागी झाल्या होत्या. परिषदेत माहिती तंत्रज्ञान व सायबर सुरक्षेच्या दृष्टीने बँकेने राबवलेल्या प्रभावी उपाययोजनांची आणि अचूक जोखीम व्यवस्थापनाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. बँकेच्या वतीने आयटी विभागप्रमुख राकेश पाटील यांनी पुरस्कार स्वीकारला.

# नवीन सहकार धोरणात मर्यादित रकमेपर्यंत ठेवींना संरक्षण मिळावे - मराठे

**जळगाव** – राज्याच्या नवीन सहकार धोरणात मर्यादित रकमेपर्यंत ठेवींना संरक्षण मिळावे यासाठी शिफारस करण्यात येणार आहे, अशी माहिती आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी केली आहे.

सहकार भारती आणि बळवंत नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सहकार परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक गौतम बलसाणे होते.

सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, जिल्हा बँक अध्यक्ष संजय पवार, मार्केटिंग फेडरेशन उपाध्यक्ष रोहित निकम, सहकार भारतीचे दिलीप पाटील, राष्ट्रीय महिला प्रमुख रेवती शेंदुर्णीकर, सहकार भारती प्रशिक्षण केंद्र अध्यक्ष संजय बिर्ला, बँक असोसिएशन अध्यक्ष



चंद्रहास गुजराथी, तसेच सहकार भारतीचे जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

मराठे यांनी सांगितले की, राज्यातील व्यवहारात ४१ लाख कोटीची रोकड चलनात आहे. त्यातील २२ लाख कोटींचे चलन ग्रामीण भागातील जनतेचे आहे. विविध सहकारी संस्थामधील ठेवीना संरक्षण दिल्यास शेतीपूरक व्यवसायाच्या विकासाला हातभार लागणार आहे. सहकार क्षेत्राला उभारी देण्यासाठी ग्रामीण व्यवस्थेला चालना द्यावी लागणार आहे. अन्य देशात ठेवींना संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे आपल्याकडे याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

जुगादे यांनी नवीन सहकार धोरणाबाबत सविस्तर विवेचन केले. प्रमोद माळी यांनी सूत्रसंचालन केले.

# जळगाव जनता सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी नितीन माणकचंद झंवर

**जळगाव** – जळगाव जनता बँकेच्या उपाध्यक्षपदी बँकेचे संचालक सीए नितीन माणकचंद झवर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

बँकेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या संचालक मंडळाच्या विशेष सभेत अध्यासी अधिकारी सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, विशाल ठाकुर यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया पार पडली. हरिश्चंद्र दौलतराव यादव यांनी सूचक तर संजय यशवंत प्रभुदेसाई यांनी अनुमोदन दिले.

बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने व सर्व संचालक मंडळाने नवनिर्वाचित उपाध्यक्ष सीए झवर यांचा सत्कार केला. बँकेचे ज्येष्ठ संचालक सीए अनिल राव, संचालिका डॉ. आरती हुजूरबाजार, संचालक हरिश्चंद्र यादव, जयंतीलाल सुराणा, डॉ. अतुल सरोदे, संजय प्रभुदेसाई, डॉ. सुरेंद्र सुरवाडे, हिरालाल सोनवणे, सपन झुनझुनवाला, डॉ. पराग देवरे, जवाहर पटेल, विलास रेलन, सीए सुभाष लोहार, संचालिका संध्या देशमुख तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती हे उपस्थित होते.




केशवस्मृती समूहाचे प्रमुख डॉ. भरत अमळकर आणि संजय बिर्ला यांनी नवनियुक्त उपाध्यक्ष सीए झवर यांचे अभिनंदन केले आहे.

# सहकार भारती तर्फे सागर बिरनाळे सन्मानित



**सांगली –** सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल सागर बिरनाळे यांचा सहकार भारती सांगली महानगर शाखेतर्फे सत्कार करण्यात आला. सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, सांगली अर्बन बँकेचे संचालक सागर घोंगडे, सांगली महानगर महामंत्री शैलेश पवार, संघटन प्रमुख संदीप कुलकर्णी, मधुकर पाटील, सतीश सावंत, अमोल बोळाज, श्रीवल्लभ कुलकर्णी, सुरेश कोरे, श्रीशैल कोठावळे, सुषमा कुलकर्णी, उत्कर्षा लाडे, महानंदा शेटे उपस्थित होते.

# नागरी सहकारी बँक आदर्श उपविधी समिती अध्यक्षपदी दिनेश ओउळकर



**मुंबई –** नागरी सहकारी बँकांसाठी आदर्श उपविधी तयार करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने उच्चस्तरीय समिती तयार केली असून समितीच्या अध्यक्षपदी सहकार विभागाचे अतिरिक्त आयुक्त आणि विशेष निबंधक निवृत्त दिनेश ओउळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही समिती येत्या तीन महिन्यात समिती अहवाल देणार आहे.

ओउळकर यांनी यापूर्वी राज्य शासनाच्या विविध अभ्यास समित्यांवर काम केले आहे. त्याअनुषंगाने आरबीआयने त्यांची निवड केली आहे. ही समिती नागरी बँकातील आर्थिक शिस्त, उत्तम कार्यपद्धती आणि भांडवली उभारणीस प्रोत्साहन मिळावे, अशा पद्धतीने उपविधी करण्याबाबत शिफारशी करणार आहे.

समितीमध्ये टीजेएसबी बँक संचालक आर सीव्ही शेषाचलम कवी, डोंबिवली सहकारी बँक अध्यक्ष गणेश धारगळकर, आरबीआय निवृत्त अधिकारी पी. के. अरोरा आणि मुरली किष्णा यांचा समावेश आहे.

# आदर्श नियमावली समितीवर ॲड. गणेश धारगळकर



**डोंबिवली –** डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड. गणेश धारगळकर यांची रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांसाठीच्या आदर्श नियमावली तयार करणाऱ्या समितीवर निवड केली आहे. तब्बल ५० वर्षांनंतर ही समिती पुन्हा गठित करण्यात आली असून देशभरातील केवळ पाच तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या नियमावलीची आखणी करण्याची जबाबदारी समितीवर असणार आहे. अशा समितीवर ॲड. धारगळकर यांची निवड होणे ही गौरवाची बाब मानली जात आहे. सहकार आणि बँकिंग क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवाची दखल घेत रिझर्व्ह बँकेने त्यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. ॲड. धारगळकर यांच्या यशाबद्दल विविध सामाजिक, सहकारी आणि बँकिंग क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नागरी सहकारी बँकांचे पोटनियम रिझर्व्ह बँकेकडूनच संमत केले जातात व त्यानंतर सहकार आयुक्त कार्यालयाकडून त्याला अंतिम मान्यता मिळते. या पार्श्वभूमीवर नवीन होणारे आदर्श पोटनियम सर्वसमावेशक व सहकाराला बळकटी देणारे व्हावेत, अशी मागणी आहे.

# महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष अनंतराव थोपटे यांचे निधन



**पुणे –** महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष तसेच पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे माजी संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक तसेच माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. मागच्या काही दिवसांपासून थोपटे यांची प्रकृती ठीक नव्हती.

महिनाभरापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांचा मूळ पिंड हा कार्यकर्त्याचा होता. त्यामुळे शासकीय सेवेचा राजीनामा देत ते राजकारणात सक्रिय झाले. वयाच्या ३९ व्या वर्षी म्हणजेच १९७२ मध्ये त्यांनी भोर वेल्हे विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवली ते विजयी झाले. त्यानंतर ते काँग्रेसशी जोडले गेले, तब्बल ३० वर्षे भोर विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधीत्व केले. तब्बल १४ वर्षे राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी काम केले. शिक्षण, दुग्धविकास, पशुसंवर्धन, परिवहन, रोहयो, फलोत्पादन, मत्स्य व्यवसाय, संसदीय कामकाज अशी अनेक महत्त्वाची खाती त्यांनी सांभाळली.

महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. याशिवाय पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे संचालक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी नेटाने पार पाडल्या. पुण्याचे पालकमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. अभ्यासू दृष्टीकोन, अचूक निर्णयक्षमता आणि लोकसंपर्क ही अनंतरावांची वैशिष्ट्ये होती. कार्यालयीन कामकाजाबरोबरच प्रशासकीय कामाची तंतोतंत माहिती असलेले मंत्री अशी त्यांची प्रतिमा होती.

# सुवर्ण बंदी नव्हे ही तर सुवर्ण संधी!

सीमेवर सैनिक देशाचे रक्षण करतात; तर आर्थिक शिस्त पाळणारा सजग नागरिक देशाच्या अर्थव्यवस्थेचे रक्षण करतो, या ब्रीदवाक्याला केंद्रस्थानी ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अलीकडेच देशवासियांना एक महत्त्वाचे आवाहन केले आहे. केवळ सोन्याची भौतिक खरेदी टाळून, कच्च्या तेलाची आयात कमी करण्यासाठी आणि मौल्यवान परकीय चलन (Foreign Exchange) वाचवण्यासाठी हातभार लावायचा आहे. आपण वाचवलेला रुपया आणि केलेली शिस्तबद्ध गुंतवणूक हे राष्ट्राच्या विकासासाठी इंधन ठरणार आहे. बचतीतून राष्ट्रविकासाची ही एक 'सुवर्णसंधी' असून, सामान्य नागरिकाने पाळलेली ही आर्थिक शिस्तच खऱ्या अर्थाने आधुनिक काळातील 'राष्ट्रभक्ती' ठरणार आहे.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

**● जागतिक अशांतता आणि भारताचे आर्थिक कवच –**

आजचे जग एका अनिश्चिततेच्या धुक्यात हरवलेले दिसत आहे. रशिया-युक्रेन संघर्ष असो वा मध्यपूर्वेतील धगधगता तणाव, या सर्वांचा धूर भारताच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचत आहे. कच्च्या तेलाच्या उसळत्या किमती, डॉलरचे वाढते जागतिक वर्चस्व आणि जागतिक मंदीची टांगती तलवार यांमुळे प्रत्येक राष्ट्राला आपली आर्थिक तटबंदी मजबूत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत, 'आर्थिक राष्ट्रभक्ती' ही केवळ संकल्पना उरत नाही, तर ती काळाची गरज बनते. भारतासारख्या विकसनशील देशासाठी परकीय चलन साठा हा आपल्या रक्ताभिसरण प्रक्रियेसारखा आहे. जेव्हा आपण कच्चे तेल किंवा सोने आयात करतो, तेव्हा देशाचा मौल्यवान परकीय चलनसाठा बाहेर जातो. म्हणूनच, सरकारने सोन्याच्या आयातीवर किंवा गुंतवणुकीवर घातलेले निर्बंध हे राजकीय नसून, ते 'आर्थिक संरक्षणात्मक' कवच आहेत.

**● सोन्याची मोहिनी आणि भारतीय मानसिकता –**

भारतात सोने हे केवळ एक धातू नाही, तर ते परंपरा, स्त्रीधन आणि संकटकाळातील 'लास्ट रिसॉर्ट' (अंतिम आधार) मानले जाते. ग्रामीण भागात आजही बँकांपेक्षा सोन्याच्या दागिन्यांवर अधिक विश्वास ठेवला जातो.जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे :

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।

अर्थात, उत्तम व्यवहाराने धन मिळवावे आणि त्याचा विनियोग विवेकाने करावा.



सोन्यात गुंतवणूक करणे गैर नाही, मात्र जेव्हा ही गुंतवणूक 'निर्जीव' (Dead Investment) होते, तेव्हा ती देशाच्या अर्थव्यवस्थेला खिळ घालते. आपण खरेदी केलेले सोने कपाटात पडून राहते, ज्याचा उपयोग उत्पादक कामांसाठी होत नाही. हाच पैसा जर बँकिंग प्रवाहात आला, तर तो देशाच्या विकासाला गती देऊ शकतो.

**● ऐतिहासिक धांडोळा : राजकीय नव्हे, तर आर्थिक गरज –**

भारताने जेव्हा-जेव्हा आर्थिक संकटाचा सामना केला, तेव्हा सरकारची विचारसरणी कोणतीही असो, सोन्यावर निर्बंध आलेच आहेत. हे निर्णय राजकीय चष्म्यातून पाहण्याऐवजी अर्थव्यवस्थेच्या गरजेतून पाहणे आवश्यक आहे :

✻ **१९६२-१९६८ चा काळ :** भारत-चीन युद्धानंतर परकीय चलनाची प्रचंड चणचण भासली. तत्कालीन सरकारने 'गोल्ड कंट्रोल ॲक्ट' आणला. उद्देश एकच होता - तस्करी रोखणे आणि परकीय चलन वाचवणे.

✻ **१९९१ ची हतबलता :** भारतावर असा काळ आला की, केवळ १५ दिवसांच्या आयातीपुरता पैसा उरला होता. त्या वेळी देशाला आपले सोने लंडनच्या बँकेत गहाण ठेवावे लागले. हा प्रसंग आजही भारताला आर्थिक शिस्तीची आठवण करून देतो.

✻ **२०१३ चे संकट :** २०१३ मध्ये भारताची चालू खाते तूट (CAD) ऐतिहासिक पातळीवर पोहोचली होती. रुपया कोसळत होता. तेव्हा तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांनी सोन्याच्या आयातीवर '८०:२० नियम'✻✻ लागू केला. म्हणजे, १०० किलो सोने आयात केले तर त्यातील २० किलो दागिन्यांच्या स्वरूपात निर्यात करणे बंधनकारक होते. हे पाऊल रुपयाला वाचवण्यासाठी उचलले गेले होते.

✻ **२०१५ नंतरची धोरणे :** २०१५ मध्ये 'गोल्ड मॉनेटायझेशन स्कीम' आणि 'सॉव्हेरन गोल्ड बाँड' (SGB) सुरू करण्यात आले. उद्देश हाच होता की, लोकांनी प्रत्यक्ष सोने खरेदी करण्याऐवजी कागदी किंवा डिजिटल सोन्यात गुंतवणूक करावी, जेणेकरून सोन्याची प्रत्यक्ष आयात कमी होऊन परकीय चलन वाचेल.

या सर्व कालखंडांवर नजर टाकली तर लक्षात येते की, सरकार कोणत्याही पक्षाचे असो, जेव्हा देशाच्या तिजोरीवर ताण येतो, तेव्हा सोन्याच्या अर्थकारणात हस्तक्षेप करणे ही 'राष्ट्रीय जबाबदारी' ठरते.

**● बँकिंग क्षेत्रातील 'गेम चेंजर' : बचतीचे नवे प्रवाह**

सोन्यावरील निर्बंध किंवा सोने खरेदीतील घट ही केवळ एक मर्यादा नसून ती सर्वसामान्य ग्राहकांसाठी गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण करणारी बाब आहे. जेव्हा पैसा सोन्याच्या 'निर्जीव' गुंतवणुकीतून बाहेर पडतो आणि बँकिंग प्रवाहात येतो, तेव्हा तो 'सजीव' होतो. याचे थोडक्यात परिणाम खालीलप्रमाणे मांडता येतील :

**१. बँकांची तरलता** (Liquidity) **आणि कर्जपुरवठा :**

जेव्हा नागरिक सोने खरेदी कमी करून तो पैसा मुदत ठेवी (FD), आवर्ती ठेवी (RD) किंवा बचत खात्यात ठेवतात, तेव्हा बँकांकडे मोठ्या प्रमाणावर 'कॅश रिझर्व्ह' तयार होतो. बँकांकडे जेवढी जास्त तरलता असेल, तेवढी त्यांची कर्जवाटप करण्याची क्षमता वाढते. यामुळे शेती, शिक्षण आणि उद्योगांसाठी खेळते भांडवल उपलब्ध होते.

**२. व्याजदरांचे अर्थशास्त्र :**

बँकिंगच्या नियमानुसार, जेव्हा बँकेकडे निधी मुबलक असतो, तेव्हा बँका आपले व्याजदर स्पर्धात्मक ठेवू शकतात. मुबलक निधीमुळे गृहकर्ज (Home Loan), वाहन कर्ज (Vehicle Loan) आणि व्यवसाय कर्जाचे व्याजदर कमी होण्यास मदत होते. याचा थेट फायदा मध्यमवर्गीय ग्राहकाला होतो, ज्याचे घराचे स्वप्न स्वस्त व्याजदरामुळे पूर्ण होऊ शकते.

**३. 'डेड इन्व्हेस्टमेंट' कडून 'प्रॉडक्टिव्ह इन्व्हेस्टमेंट'कडे :**

सोन्याचे बिस्किट किंवा दागिने कपाटात राहून केवळ त्याची किंमत वाढते, पण त्यातून कोणतीही नवी संपत्ती किंवा रोजगार निर्माण होत नाही. याउलट, बँकेतील पैसा जेव्हा उद्योजकाला कर्जाच्या स्वरूपात मिळतो, तेव्हा त्यातून कारखाना उभा राहतो आणि शेकडो लोकांना रोजगार मिळतो.

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# सुवर्ण बंदी नव्हे ही तर सुवर्ण संधी!

अशा प्रकारे, तुमची वैयक्तिक बचत ही देशाच्या उत्पादकतेचा हिस्सा बनते.

**४. डिजिटल गोल्ड आणि सुरक्षितता :**

आताच्या युगात ''सॉव्हेरन गोल्ड बाँड' (Sovereign Gold Bond) हा एक उत्तम पर्याय आहे. यामध्ये ग्राहकाला सोन्याची प्रत्यक्ष साठवणूक करण्याची गरज नसते, त्यामुळे चोरीची भीती किंवा लॉकरच्या खर्चाची चिंता उरत नाही. विशेष म्हणजे, सोन्याच्या वाढत्या किमतीचा फायदा मिळण्यासोबतच सरकारकडून वार्षिक २.५% खात्रीशीर व्याजही मिळते. ही खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' गुंतवणूक आहे.

**५. भांडवल बाजाराला मिळणारी गती :**

बचतीचे नवे प्रवाह जेव्हा म्युच्युअल फंड किंवा 'सिस्टमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन' (SIP) कडे वळतात, तेव्हा देशांतर्गत भांडवल बाजार मजबूत होतो.

परकीय गुंतवणुकीवर (FII) अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी होऊन आपला शेअर बाजार आत्मनिर्भर होतो. यामुळे भारतीय कंपन्यांना विस्तार करण्यासाठी देशातच स्वस्त भांडवल उपलब्ध होते.

**● जागतिक अर्थव्यवस्थांमधील 'आर्थिक राष्ट्रवादाचा' वस्तुपाठ –**

१९९७ च्या आशियाई आर्थिक संकटात दक्षिण कोरिया जेव्हा दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता, तेव्हा तेथील जनतेने 'गोल्ड कलेक्टिंग कॅम्पेन' राबवून स्वतःचे दागिने सरकारकडे जमा केले आणि आयएमएफचे कर्ज फेडले; हा 'आर्थिक राष्ट्रवादाचा' सर्वात मोठा आदर्श आहे. जर्मनीनेही दुसऱ्या महायुद्धानंतर कठोर आर्थिक काटकसर आणि उत्पादक कामावर लक्ष केंद्रित करून स्वतःला सावरले, तर जपान आणि चीनने उच्च बचत दराच्या जोरावर जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवले. या सर्व देशांच्या उदाहरणांतून हीच शिकवण मिळते की, जेव्हा सामान्य नागरिक आपली आर्थिक शिस्त 'देशाच्या हिताशी' जोडतो, तेव्हाच राष्ट्र सामर्थ्यवान बनते. आज भारतालाही अशाच सजगतेची गरज आहे. केवळ सोन्याची भौतिक खरेदी थांबवून चालणार नाही, तर बचतीचे नवे मार्ग शोधून आपल्याला मौल्यवान परकीय चलन (Foreign Exchange) वाचवायचे आहे. सोन्याची आणि कच्च्या तेलाची अनावश्यक आयात कमी केल्यास देशाचा पैसा देशातच राहून विकासाला गती मिळेल. म्हणूनच, 'गोल्ड बाँड्स'मधील गुंतवणूक वाढवणे आणि स्थानिक उत्पादनांचा आग्रह धरणे ही केवळ वैयक्तिक बचत नसून, ती खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीतील 'आर्थिक राष्ट्रभक्ती' आहे.

**● ग्रामीण अर्थव्यवस्था आणि बँका व पतसंस्थांची भूमिका –**

बँका आणि पतसंस्था ग्रामीण भारताचा कणा आहेत. सोन्याच्या व्यापारातील अनौपचारिक व्यवहारांऐवजी जर व्यवहार बँकिंग चॅनेलद्वारे झाले, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेत पारदर्शकता येईल. पतसंस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वस्त कर्जपुरवठा करणे सुलभ होईल.

योग्य आर्थिक 'नीती' असेल, तरच 'वित्ताचा' योग्य वापर होऊन प्रगती साधता येईल.

**● आव्हाने आणि उपाय : सुवर्णमध्य गाठताना**

सोन्यावर कडक निर्बंध किंवा आयात शुल्कात वाढ केल्यास तस्करी वाढण्याची भीती असते. ज्वेलरी क्षेत्रातील कारागिरांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणूनच, सरकार आता 'सॉव्हेरन गोल्ड बाँड' सारखे पर्याय देत आहे. यामध्ये तुम्हाला सोन्याच्या किमतीतील वाढीचा फायदाही मिळतो आणि वार्षिक व्याजही मिळते. ही गुंतवणूक देशाला डॉलर वाचवण्यास मदत करते आणि बँकिंग प्रणालीला मजबूत करते.

**● एका नव्या आर्थिक युगाची पहाट**

**राष्ट्रनिर्मितीसाठी आर्थिक शिस्त: एक अपरिहार्य पाऊल**

सोन्यावरील निर्बंध किंवा बचतीचे बदललेले स्वरूप ही केवळ राजकीय घोषणा नसून, ती एका बलाढ्य भारताच्या निर्माणाची प्रक्रिया आहे. घरातील कर्ता पुरुष जसा संकट काळासाठी विनाकारण खर्च टाळून बचत करतो, तसेच देश म्हणून आपल्याला काही 'कडू डोस' घ्यावे लागतात. प्रत्येक नागरिकाने हे समजून घेतले पाहिजे की, आपल्या बचतीचा एक हिस्सा जेव्हा बँकिंग व्यवस्थेत येतो, तेव्हा तो देशाच्या प्रगतीचे चक्र फिरवत असतो. सोन्याच्या कपाटातील पडून राहिलेल्या तुकड्यापेक्षा, बँकेच्या खात्यात फिरणारा रुपया अधिक शक्तिशाली असतो. आपण आपली गुंतवणूक जेव्हा उत्पादक कामात लावतो, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने राष्ट्रहितासाठी योगदान देत असतो.

महत्त्वाची बाब म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हे आवाहन किंवा सरकारचे हे धोरण पहिल्यांदाच घडत नाही, तर जागतिक संकटातून मार्ग काढण्यासाठी अनेक प्रगत देशांनी वेळोवेळी असे निर्णय घेतले आहेत. याकडे राजकीय चष्म्यातून न पाहता आर्थिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. सरकार कोणतेही असो, शेवटी राष्ट्र सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी असे धाडसी निर्णय प्रसंगावधान राखून घ्यावे लागतात. ही सकारात्मक मानसिकता जेव्हा प्रत्येक नागरिकात रुजेल आणि देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यात सर्वांचे योगदान असेल, तेव्हाच 'समृद्ध नागरिक आणि सक्षम राष्ट्र' ही खऱ्या अर्थाने विकसित भारताची ओळख जागतिक पटलावर निर्माण होईल.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल –** nimkarganeshgmail.com

*****

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

**भारतात कुठेही**
**निश्चित अंक मिळण्यासाठी**
**मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com




# पुणे पीपल्स सहकारी बँकेचा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने गौरव

**पुणे** – येथील पुणे पीपल्स सहकारी बँकेला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. क्रेस्ट इन्फो मीडिया यांच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड, उपाध्यक्ष बिपिनकुमार शहा व्यवस्थापकीय मंडळ अध्यक्ष सुभाष मोहिते, तसेच संचालक, अधिकारी उपस्थित होते.

सहकारी बँकिंग क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर सातत्याने पुरस्कार मिळविणारी बँक आहे. आर्थिक स्थिरता आणि उत्कृष्ट सेवा हे बँकेचे ब्रीद आहे, असे सांगण्यात आले.

# पीपल्स बँक अमृत महोत्सवी वर्षनिमित्त 'बँकिंग गप्पा' परिसंवाद यशस्वी

**पुणे** – पुणे पीपल्स को-ऑप. बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षनिमित्त बँकिंग गप्पा हा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. परिसंवादात सहकारी बँकाची घटती संख्या, केंद्र आणि राज्य शासनाचे धोरण, आरबीआयची भूमिका माहिती तंत्रज्ञान व एआयचा वाढता वापर, यावर चर्चा करण्यात आली.




रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतिश मराठे आणि इतर नामवंत सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्या सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी परिसंवादाचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन केले. एनकेजेएसबी बँक व्यवस्थापकीय संचालक प्रणाली धारधर, कॉसमॉस बँक माजी अध्यक्ष मिलिंद काळे, पीपल्स बँक माजी अध्यक्ष सुभाष मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. बँक अध्यक्ष श्रीधर गायकवाड यांनी स्वागत तर मोहिते यांनी आढावा घेतला. संचालक बबनराव भेगडे व मुख्य कार्यकारी अधिकारी संजय घोडके यांनी सूत्रसंचालन केले.

या विशेष प्रसंगी ज्येष्ठ बँकर डॉ. दिलीप देशमुख लिखित 'Banking Updates for UCB's' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. बँकेने नुकत्याच झालेल्या ३ व्या नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिटमध्ये 'बेस्ट मल्टि-स्टेट अर्बन को-ऑप बँक' आणि अध्यक्षांना 'बेस्ट चेअरपर्सन' पुरस्कारासह तब्बल ५ मानाचे पुरस्कार पटकावले आहेत.

# राज्य सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नवीन नियमांना राज्य शासनाची मंजूरी

**पुणे** – राज्य सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमांना राज्य शासनाने मंजूरी दिली आहे. यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाज अधिक सुकर होण्यास मदतच होणार आहे. नवीन नियमांमुळे देखभाल शुल्क, थकबाकी सभासदत्त्व हस्तांतरण पुनर्विकास व आर्थिक व्यवस्थापनात स्पष्टता येणार आहे.

नवीन सुधारित नियम आधुनिकीकरण आणि दीर्घकालीन वाद कमी करण्यासाठी तयार करण्यात आले असून सहा वर्षाच्या प्रतिक्षानंतर नियमांमुळे राज्यातील सुमारे सवा लाख सहकारी ग्रहनिर्माण संस्थांच्या कामकाजात मोठे बदल होणार आहेत. नव्या नियमनामुळे देखभाल शुल्क, थकबाकी सभासदत्व हस्तांतरण आणि पुनर्विकास, आर्थिक व्यवस्थापनात स्पष्टता येणार असल्याचे सहकार विभागाकडून सांगण्यात आले. नवीन नियन बराच काळ प्रलंबित होते. त्याबाबत करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे अखेर मंजूरी मिळाली आहे. परिणामी अनेक सुधारणा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



याबाबत सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले की, सहकार कायद्यात दुरूस्ती होऊन नियमावली मंजूर करण्यात आला आहे सहकार विभागाकडून सहकारी गृहनिर्माण संस्थासाठी आदर्श उपविधी आणण्यात येणार आहेत. सर्व संस्थांनी यास मंजूरी दिल्यानंतर कामकाज अधिक सुकर होण्यास हातभार लागणार आहे.

# कर्मचारी होतील जेव्हा पूर्ण प्रशिक्षित; सर्वसामान्यांचा पैसा तेव्हाच सुरक्षित!

सहकार चळवळ हा भारतीय ग्रामीण आणि नागरी अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे, परंतु केवळ पतसंस्था असणे पुरेसे नसून त्या 'प्रशिक्षित' आणि 'व्यावसायिक' असणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. पतसंस्थांचा वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम हा केवळ एक सोपस्कार किंवा कायदेशीर निकष नसून तो संस्थेच्या प्रगतीचा, पारदर्शकतेचा आणि आर्थिक सुरक्षिततेचा महामार्ग आहे.



मंगेश देहडेकर
९९२१३ ०४८११

भारतासारख्या विशाल देशात जिथे आर्थिक साक्षरता अजूनही पूर्णपणे रुजलेली नाही, तिथे पतसंस्था हा सामान्य माणसासाठी शेवटचा आशाकिरण असतो. मात्र, जर या संस्था चालवणारे मनुष्यबळ-मग ते संचालक मंडळ असो किंवा कर्मचारी-जर आधुनिक बँकिंग प्रणाली, कायदेशीर तरतुदी आणि जोखीम व्यवस्थापनात प्रशिक्षित नसतील, तर त्या संस्था डबघाईला येण्याची शक्यता अधिक असते. म्हणूनच, देशाला केवळ पतसंस्था नको आहेत, तर त्या तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि प्रशिक्षित हातांनी चालवल्या जाणाऱ्या संस्था हव्यात. प्रशिक्षित मनुष्यबळामुळे संस्थेची कार्यक्षमता वाढते, निर्णय प्रक्रियेत सुसूत्रता येते आणि सर्वसामान्यांचा घामाचा पैसा सुरक्षित राहतो.

लहान आणि नवोदित संस्थांना प्रशिक्षणाची खरी गरज

अनेकदा नव्याने स्थापन झालेल्या संस्था किंवा ज्यांचा व्यवसाय मर्यादित (लहान) आहे अशा संस्था काही कारणास्तव किंवा 'खर्च वाचवण्याच्या' भावनेतून प्रशिक्षणापासून दूर राहतात. परंतु, वस्तुस्थिती अशी आहे की अशाच लहान संस्थांना प्रशिक्षणाची सर्वाधिक आणि पहिली गरज असते. सुरुवातीच्या काळात चुका झाल्या तर संस्था रुजण्यापूर्वीच मोडकळीस येऊ शकते, त्यामुळे पाया मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण अनिवार्य आहे.

आज पतसंस्था क्षेत्रात सर्वात मोठी समस्या म्हणजे 'निर्णयक्षम अधिकारी' न मिळणे ही आहे. बाजारात अनुभवी आणि निर्णय घेणारे अधिकारी सहजासहजी उपलब्ध होत नाहीत; आणि समजा काही मिळालेच, तर त्यांचा मासिक पगार व खर्च पेलणे लहान किंवा मध्यम पतसंस्थांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसते. मग यावर एकमेव आणि शाश्वत उपाय कोणता? तर आपल्याच संस्थेतील विद्यमान कर्मचाऱ्यांना सातत्याने दर्जेदार प्रशिक्षण देऊन, त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित करणे आणि स्वत:चे सक्षम अधिकारी आपल्याच संस्थेत घडविणे!

*भयाचिये पोटीं कर्माचीच हानी।*

अनेकदा पतसंस्थांचे व्यवस्थापन किंवा संचालक एक भीती व्यक्त करतात की, आम्ही जर कर्मचाऱ्याला लाखो रुपये खर्च करून चांगले प्रशिक्षण दिले, आणि तो हुशार झाला, तर त्याला इतर संस्था अधिक पगार देऊन आपल्याकडून पळवून नेतील. परंतु, हा विचार पूर्णपणे चुकीचा आणि प्रगतीला खीळ घालणारा आहे. यासाठी सहकारात एक म्हण अत्यंत चपखल बसते:

*जैसें जळदें वर्षिजे। कां पिकेवीण शेत पेरिजे।*
*तैसें कर्माचें निपजणें। न पहावें गा।।*

विचार करा, जर तुम्ही कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले नाही आणि ते अपरिपक्व राहिले, तर ते संस्थेत राहून अज्ञानापोटी ज्या चुका करतील, त्यामुळे संस्थेचे होणारे आर्थिक नुकसान हे तो कर्मचारी सोडून जाण्याच्या नुकसानापेक्षा हजार पटीने मोठे असेल! उलट, जर महाराष्ट्रातील सर्वच संस्थांनी आपापल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली, तर संपूर्ण सहकार क्षेत्रात कधीच चांगल्या आणि सक्षम कर्मचाऱ्यांची कमतरता भासणार नाही.

मागील १८ वर्षांच्या बँकिंग क्षेत्रातील अनुभवात मी शेकडो पतसंस्था आणि बँकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले आहे. या प्रदीर्घ अनुभवातून आत्मविश्वासाने सांगू शकतो की, ज्या ज्या संस्थांनी प्रशिक्षणावर भर दिला आहे, तिथला कर्मचारी वर्ग उलट संस्थेशी अधिक एकनिष्ठ राहिला आहे आणि त्यांनी संस्थेचा व्यवसाय वाढवण्यात मोलाचे योगदान दिले आहे. प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्याची निष्ठा आणि कार्यक्षमता दोन्ही वाढते.

**❊ पतसंस्थांचा आदर्श वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आणि आर्थिक नियोजन –**

या संपूर्ण प्रक्रियेला गती देण्यासाठी पतसंस्थांचा वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम हा अत्यंत नियोजनबद्ध आणि वर्षभराच्या आव्हानांना तोंड देईल असा तयार केलेला असावा. या कार्यक्रमाची विभागणी प्रामुख्याने संचालक मंडळ, व्यवस्थापकीय कर्मचारी, लिपिक व रोखपाल, वसुली कर्मचारी तसेच ठेव वाढ व ग्राहक सेवा अशा पाच महत्त्वाच्या घटकांमध्ये करावी लागते. वर्षाच्या सुरुवातीलाच, म्हणजेच एप्रिल महिन्यात, संस्थेने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांचे मूल्यमापन करून एक निश्चित 'ट्रेनिंग कॅलेंडर' तयार करणे आवश्यक आहे. केवळ वर्गात बसून व्याख्याने देण्याऐवजी प्रात्यक्षिके, केस स्टडीज आणि नामांकित संस्थांच्या प्रत्यक्ष भेटी अशा स्वरूपात हे प्रशिक्षण आयोजित केले पाहिजे, जेणेकरून कर्मचाऱ्यांमध्ये व्यावहारिक समज वाढेल.

या प्रशिक्षण आराखड्यात प्रत्येक स्तरासाठी स्वतंत्र आणि उद्दिष्टपूर्ण सत्रांची रचना असणे गरजेचे आहे. संचालक मंडळासाठी धोरणात्मक निर्णय, मालमत्ता आणि दायित्व व्यवस्थापन (ALM) आणि गव्हर्नन्स मानके यावर विशेष भर दिला पाहिजे, कारण चुकीच्या धोरणात्मक निर्णयांमुळे संस्था मोठ्या संकटात सापडू शकतात. व्यवस्थापकीय आणि क्रेडिट टीमसाठी कर्ज प्रकरणांची छाननी करताना मालमत्तेचा सर्च रिपोर्ट आणि व्हॅल्युएशन रिपोर्ट या तांत्रिक दस्तऐवजांचे विश्लेषण कसे करावे, याचे प्रगत प्रशिक्षण दिले पाहिजे. वकिलांनी किंवा व्हॅल्युअरने दिलेल्या अहवालातील 'रेड फ्लॅग्स' म्हणजेच धोक्याच्या घंटा कशा ओळखाव्या, हे क्रेडिट मॅनेजर्सना अचूकपणे समजले पाहिजे. तसेच, कर्ज घेणाऱ्या व्यक्तीचे वित्तीय विश्लेषण, ताळेबंद तपासणी आणि सिबिल अहवालाचे वाचन या गोष्टींचा प्रामुख्याने समावेश असायला हवा. फ्रंट-ऑफिस कर्मचारी आणि कॅशियर्ससाठी 'नो युवर कस्टमर' (KYC) नियमांचे अचूक पालन आणि मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदे (AML), कोअर बँकिंग प्रणाली आणि सायबर सुरक्षा यांचे प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे, कारण येथे होणाऱ्या एका छोट्या चुकीमुळे संस्थेला मोठ्या कायदेशीर दंडाला सामोरे जावे लागू शकते. तसेच वसुली कर्मचाऱ्यांसाठी कायदेशीर वसुलीच्या विविध पद्धती, ग्राहक सेवा आणि संवाद कौशल्याच्या जोरावर थकबाकी कमी करण्याचे तंत्र शिकवणे अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक नियोजनाचा विचार केला तर, पतसंस्था प्रशिक्षणावर किती खर्च करू शकते याचे स्पष्ट नियम सहकार कायद्यात आणि संस्थेच्या उपविधीत दिलेले असतात. सर्वसाधारणपणे, कोणतीही पतसंस्था आपल्या वार्षिक निव्वळ नफ्याच्या १% ते ३% रक्कम ही 'कर्मचारी प्रशिक्षण आणि कल्याण निधी' म्हणून बाजूला ठेवू शकते. काही राज्यांच्या सहकार कायद्यानुसार, निव्वळ नफ्यातून ठराविक हिस्सा राज्य सहकार संघ किंवा जिल्हा सहकार मंडळाकडे प्रशिक्षण फी म्हणून देणे कायदेशीररीत्या बंधनकारक असते. जर

**पुढील पानावर...**

# नागरी सहकारी बँकांची वाटचाल अनुपालन संस्कृतीच्या दिशेने व्हावी

रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. त्यातील नागरी सहकारी बँकांबाबत नोंदवलेले निरीक्षण पुढील प्रमाणे आहे.



उदय पेंडसे
९८६९०३४६६२

सन २०२५-२६ या वर्षभरात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या देखरेख विभागाने नागरी सहकारी बँकांच्या कामकाजावर लक्ष ठेवले. या बँका सुरक्षित आणि चांगल्या पद्धतीने चालाव्यात, यासाठी काही पावलेही उचलली. सन २०२५-२६ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने देखरेखीसाठी खालील गोष्टी करायच्या ठरवल्या होत्या.

● काही निवडक UCBs साठी ग्राहक ओळख आणि तपासणीसाठी 'जोखीम-आधारित तपासणीचा' आढावा घेणे. ● सायबर सुरक्षेबाबत नवे नियम काढणे. या कामाची पूर्तता खालीलप्रमाणे झाल्याचे नमूद केले आहे: निवडक नागरी सहकारी बँकांच्या KYC/AML बाबत जोखीम आधारित तपासणीचा (Risk Based Audit) आढावा पूर्ण झाला. आता नागरी सहकारी बँकांमध्ये असलेल्या एकूण ठेवींपैकी ६०% ठेवींबाबत जोखीम आधारित तपासणीचा उद्देश समोर ठेवला आहे. अशा प्रकारची तपासणी अधिक बारकाईने केली जाईल. कोणकोणत्या ठेवखात्यांमध्ये जोखीम आहे, त्याची नोंद आणि वर्गवारी करणे, कोणकोणते धोके येऊ शकतात याचा आढावा घेणे, त्यात KYC, मनी लाँडरिंग, अशा जोखमी आणि नवीन धोके यांचाही समावेश आहे.

नागरी सहकारी बँकांसाठी सायबर सुरक्षेबाबत नव्या नियमांचा मसुदा रिझर्व्ह बँकेने तयार केला आहे. त्यावर लोकांची मते जाणून घेण्यासाठी तो लवकरच जाहीर केला जाईल. २०२६-२७ या आर्थिक वर्षात देखरेख विभागाने खालील कामे करायचे ठरवले आहेत : ● खूप मोठ्या आणि मोठ्या (टायर ३ आणि टायर ४ मधील) नागरी सहकारी बँकांकडील माहितीची गुणवत्ता सुधारण्यासाठी मापदंड निश्चित करणे तयार करणे.

● 'मिशन सक्षम' (Sahakari Bank Kshamata Nirman) अंतर्गत प्रत्यक्ष व ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करणे व नागरी सहकारी बँकांमधील प्रत्येक घटकांची (संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अन्य अधिकारी व कर्मचारी वर्ग. देशभरातील एकूण संख्या सुमारे १.४० लाख.) क्षमता विकसित करणे ● सायबर सुरक्षा स्तर २, ३ आणि ४ मधील नागरी सहकारी बँकांसाठी 'सायबर मॅपिंग' करणे ● काही निवडक नागरी सहकारी बँकांना 'जोखीम-आधारित देखरेख' पद्धतीत आणणे. ● नागरी सहकारी बँकांच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या तपासणीची व्याप्ती वाढवणे. ● नागरी सहकारी बँकांसाठी सायबर सुरक्षेचे नवीन नियमावली तयार करणे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालातील या माहितीवरून असे लक्षात येईल की, या दोन-तीन वर्षात नागरी सहकारी बँकांनी अंतर्गत कामकाज अधिक सजगपणे करण्याची आवश्यकता आहे. नफा-तोटा, भांडवल पर्याप्तता, व्यवसाय वृद्धी, अनुत्पादित कर्जांचे व्यवस्थापन या बरोबरच (किंबहुना काकणभर अधिकच) माहिती तंत्रज्ञान विभाग, जोखीम व्यवस्थापन, सायबर सुरक्षा, व्यावसायिक व्यवस्थापन यांवर लक्ष केंद्रीत करून अनुपालन संस्कृती अंगिकारण्याची गरज आहे.

**- उदय पेंडसे, संचालक,**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था, पुणे.**

---

मागील पानावरून... 

## कर्मचारी होतील जेव्हा पूर्ण प्रशिक्षित...

एखाद्या वर्षी संस्थेचा नफा कमी असेल किंवा संस्था नवीन असेल, तर संस्था आपल्या एकूण प्रशासकीय खर्चाच्या ०.५% ते १% पर्यंतची रक्कम वार्षिक प्रशिक्षणासाठी बजेट म्हणून मंजूर करू शकते. हा खर्च करताना संस्थेने केवळ खर्च न पाहता ती एक उत्तम 'गुंतवणूक' आहे या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. आज प्रशिक्षणावर केलेला एक रुपयाचा खर्च भविष्यात थकित कर्ज (NPA) रोखून, सायबर फ्रॉडपासून संस्थेला वाचवून आणि अंतर्गत चुका टाळून संस्थेचे लाखो रुपये वाचवू शकतो. बजेट ठरवताना मागील वर्षातील ऑपरेशन्स ऑडिट आणि फॉरेन्सिक ऑडिटचे निष्कर्ष समोर ठेवावेत, जेणेकरून नेमक्या कोणत्या विभागात कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची अधिक गरज आहे, हे ओळखून निधीचे योग्य वाटप करता येईल.

खर्चाचे वर्गीकरण करताना आणि आर्थिक शिस्त पाळताना पतसंस्थेने अतिशय व्यावहारिक आणि काटकसरीचा दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणावर होणारा अवाजवी खर्च टाळण्यासाठी पतसंस्था 'इन-हाऊस ट्रेनिंग' आयोजित करू शकतात, जिथे बँकेचे पॅनेल वकील, व्हॅल्युअर किंवा वरिष्ठ अधिकारी स्वतः कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतात. याशिवाय, जिल्हा सहकार बोर्ड, सहकार भारती प्रशिक्षण संस्था, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था (VAMNICOM) किंवा प्रादेशिक सहकार व्यवस्थापन संस्था (ICM) यांच्याकडून वाजवी दरात दर्जेदार प्रशिक्षण मिळवता येते. सायबर सुरक्षा किंवा आधुनिक डिजिटल बँकिंगसारख्या अत्यंत तांत्रिक विषयांसाठी बाहेरील तज्ज्ञ संस्थांना आमंत्रित करून संयुक्त प्रशिक्षण सत्रे घेता येतात, ज्याचा खर्च इतर समविचारी पतसंस्थांसोबत 'कॉस्ट शेअरिंग'च्या माध्यमातून वाटून घेता येतो. आजच्या डिजिटल युगात 'ई-लर्निंग' आणि वेबिनारचा वापर करून प्रवासाचा आणि राहण्याचा मोठा खर्च वाचवता येतो. प्रत्येक प्रशिक्षण सत्रानंतर कर्मचाऱ्यांची चाचणी घेणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रशिक्षणाची परिणामकारकता आणि खर्चाचा मोबदला संस्थेला मिळतो की नाही, हे व्यवस्थापनाला स्पष्ट होईल.

शेवटी, प्रशिक्षणावर होणारा खर्च हा संस्थेच्या आर्थिक क्षमतेच्या मर्यादेत आणि ऑडिट नियमांना धरूनच असावा, जेणेकरून वैधानिक तपासणीत त्यावर कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही. संस्थेला एक दर्जेदार, सुरक्षित, तंत्रस्नेही आणि अत्यंत प्रशिक्षित मनुष्यबळ लाभल्यास, संस्था व्यावसायिक स्पर्धेच्या या युगात निश्चितच सहकाराचा एक नवा आदर्श निर्माण करेल आणि यशाची उत्तुंग शिखरे सर करेल.

**- मंगेश देहेडकर, पुणे.**
**प्रशिक्षक व मार्गदर्शक**
**मो.नं. - ९९२१३ ०४८११**

*****

## को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी पदाधिकारी सभासद प्रशिक्षण यशस्वी

**कल्याण -** सहकार भारती सहकारी प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने कल्याण येथील त्रिवेणी मजिस्टा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी पदाधिकारी व सभासदांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रशिक्षण संस्थेचे संचालक उदय पेंडसे उपस्थित होते. कल्याण जिल्हा सहकार भारतीचे सहसंघटन प्रमुख विनोद म्हात्रे प्रशिक्षणकर्ते गणेश मोरे उपस्थित होते. सहकार भारतीचे कार्यकर्ते मिलिंद नाईक गणेश नाईक प्रशिक्षण कार्यक्रम प्रमुख संदीप गव्हाणे सोसायटीचे सभासद पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक नाईक तर पेंडसे यांनी मार्गदर्शन केले.

## इंदापूर अर्बन बँकेचे माजी संचालक संजय बाबूलाल रायसोनी यांचे निधन

**इंदापूर, पुणे जिल्हा -** इंदापूर अर्बन बँकेचे माजी संचालक आणि भिगवण सहकारी पतसंस्थेचे संचालक संजय बाबूलाल रायसोनी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. सामाजिक राजकीय आणि सहकार क्षेत्रात ते अनेक वर्ष कार्यरत होते.



**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५

# लिपिकांकडील कामाचे व्यवस्थापन

नागरी सहकारी बँकातील शाखांमध्ये कामकाज सुरळीत व्हावे, यादृष्टीने ग्राहकांना व्यवस्थित सेवा वेळेत मिळावी यासाठी, कामकाजाचे नियोजन काटेकोरपणे करणे अत्यावश्यक आहे. महिन्याच्या विशिष्ट दिवशी (उदाहरणार्थ पहिला आठवडा) पेन्शनर, पगारदार यांची गर्दी होत असेल तर यादिवशी अधिक कॅशियर्सची व्यवस्था करणे आवश्यक असते.

महिन्याच्या तिसऱ्या, चौथ्या आठवड्यात खातेदारांची गर्दी नसल्यास कर्मचारी वर्गाकडे प्रलंबित कामांची जबाबदारी किंवा मार्केटिंगसाठी त्यांना बाहेर पाठवता येणे शक्य आहे का याचा आवर्जून विचार केला पाहिजे. प्रत्येक लिपिकाकडे पुरेसे काम आहे, हे बघण्याची जबाबदारी अधिकारी आणि शाखाधिकारी यांची आहे. पुरेसे काम नसल्यास असलेले कमी काम पुरवून करण्याची वृत्ती तयार होते. गप्पा मारणे, गॉसिपिंग करणे यात वेळ घालवला जातो. ग्राहकांसमोर या गोष्टी घडल्यास बँकेच्या प्रतिमेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असतो. या पार्श्वभूमीवर आपल्या शाखेतील प्रत्येक लिपिकाकडे दिवसभर पुरेल एवढे काम आहे का हे वेळोवेळी तपासणे अत्यंत आवश्यक आहे.



**✽ जुन्या प्रथेनुसार काम –** कोअर बँकिंग प्रणाली सुरू होऊन दहा वर्षापेक्षा अधिक काळ झाला तरीही अनेक बँकांमधून अजूनही सेव्हिंग्स, करंट, डिपॉझिट, बिल्स आणि रेमीटंसेस असे काउंटरचे विभाग दिसून येतात. वास्तविक कोअर बँकिंग प्रमाणे कोणतेही काम कोणत्याही काउंटरवर होणे शक्य आहे. असे असूनही अशास्त्रीय पद्धतीची कामकाजाची विभागणी दिसून येते. हे बदलण्याची नितांत आवश्यकता आहे. काउंटरवरील प्रत्येक लिपिकाला काऊंटरशी संबंधित सर्व कामे सिंगल विंडो पद्धतीने करता येणे अत्यंत गरजेचे आहे. नसल्यास याचे रीतसर प्रशिक्षण देऊन नव्याने कामकाजाची पुनर्विभागणी करणे आवश्यक आहे.

**✽ नवीन शाखांच्या बाबतीत –** नागरी सहकारी बँकेची नवीन शाखा उघडते त्यावेळी प्रथेनुसार क्लार्क, कॅशियर, अधिकारी, शाखाधिकारी यांची नियुक्ती होते. सुरुवातीला प्रत्येकाला पुरेसे काम असेलच असे नाही. कर्मचारी वर्गाला कमी कामाची एकदा सवय झाली की, थोडे काम वाढले तरी तक्रारीचा सूर येऊ शकतो. यासाठी नवीन शाखेत प्रत्येक कर्मचारी वर्गाला मार्केटिंगचे काम ठरवून दिले पाहिजे. एका बँकेने नवीन शाखेमध्ये ठरवून प्रत्येक कर्मचाऱ्याला शाखेपासून दोन किलोमीटर अंतरापर्यंत नव्या लहान कर्जदारांचा शोध घेण्याचे काम देऊन त्यांच्याकडून दररोज ठराविक रक्कम (उदाहरणार्थ पन्नास रुपये, शंभर रुपये) आणण्याचे काम सोपवले. यात नियमितपणे पैसे देणाऱ्यांना त्याच्या व्यवसायाच्या आकाराप्रमाणे आणि परतफेडीच्या क्षमातेनुसार कर्ज मंजूर करून रोजच्या कलेक्शनमधून कर्जफेड करून घेतली. लहान कर्जांसाठी ही अतिशय उपयुक्त अशी योजना आहे. यातून कर्मचारी वर्गाला मार्केटिंगचे आपोआपच प्रशिक्षणही मिळते. सोबतच प्रत्येक कर्मचाऱ्याला पुरेसे कामही निश्चितपणे देता येते.

**✽ शाखांचे कामानुसार वर्गीकरण –** सर्व शाखांचे त्यात असलेल्या कामानुसार वर्गीकरण करण्यात यावे. कमी काम असलेल्या शाखांमधील कर्मचारी वर्गाला तुलनेने जास्त असलेल्या शाखांमधून नियमितपणे बदली करून अतिरिक्त कामाचा अनुभव दिला गेला पाहिजे. हा अनुभव डेप्युटेशन किंवा तात्पुरती बदली करून देणे हे ही शक्य आहे. बँकेतील प्रत्येक कर्मचाऱ्याला जास्तीत जास्त काम असणाऱ्या शाखेत कामाची संधी देऊन कामाची सवय लावली पाहिजे.

हा बदल न केल्यास कमी काम असलेल्या शाखांमधील कर्मचारी, यांची कार्यक्षमता हळुहळू कमी होते असा अनुभव आहे. ज्या शाखांमध्ये काम कमी आहे अशा ठिकाणी कर्मचारी वर्गाकडे नियमितपणे मार्केटिंग, वसुलीचे काम दिले गेले पाहिजे. या कामाचे मॉनिटरिंग हे केले गेले पाहिजे. गरज नसलेल्या कर्मचाऱ्यांची बदली करणे हाही उपाय असू शकतो. सध्या राष्ट्रीयीकृत बँका किंवा प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये कमीत कमी कर्मचारी वर्गामध्ये काम करून घेण्याची पद्धत आहे. या पद्धतीचे अनुकरण नागरी सहकारी बँकांना करता येऊ शकते.

**✽ कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता –** कर्मचारी वर्गाला पुरेसे काम असणे, यामध्ये त्यांची क्षमता वाढवणे हा एकमेव हेतू असावा अतिरिक्त काम देऊन त्यांची पिळवणूक करणे हे निश्चितपणे टाळता येण्यासारखे आहे. मात्र पुरेसे काम असणे यावर भर दिला गेला पाहिजे.

कर्मचारी वर्गाला किमान अत्यावश्यक कामाची सवय असलीच पाहिजे.

लिपिकांच्या बाबतीतला हा नियम प्रशासकीय कार्यालय, मुख्य कार्यालय यातही आवर्जून पाळला जावा. प्रशासकीय कार्यालयातील लिपिक वर्गाची ठराविक अंतराने शाखांमध्ये बदली होणे आवश्यक आहे. सर्व कर्मचारी वर्गाला सर्व प्रकारच्या कामांचा अनुभव मिळावा हा त्यामधील उद्देश असावा. लिपिक कर्मचाऱ्यांना ठराविक अंतराने प्रशिक्षण देऊन त्यांची कार्यक्षमता निश्चितपणे वाढवता येऊ शकते. कार्यक्षमता वाढल्यानंतर त्यांचा बढतीसाठी विचार करता येऊ शकेल.

**✽ अधिकारी शाखाधिकारी यांची जबाबदारी –** प्रत्येक कर्मचारी वर्गाला पुरेसे काम आहे का हे पाहण्याची प्रशासकीय जबाबदारी अधिकारी आणि शाखाधिकारी यांचेवर आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या पगारावर बँकेचा खर्च होत असतो. या पार्श्वभूमीवर प्रत्येक कर्मचाऱ्याकडून पुरेसे काम करून घेणे ही अधिकारी वर्गाची जबाबदारी आहे. प्रशासकीय जबाबदारी म्हणून ही कठोरपणे पार पडली पाहिजे. यामध्ये मवाळपणा किंवा सवलती देण्याची चूक केली जाऊ नये. बँकेच्या मानव संसाधन विभागाने याकडे गंभीरपणे लक्ष देणे आवश्यक आहे. नियंत्रणाचा भाग म्हणून संचालक मंडळाने ठराविक अंतराने या गोष्टींचा आढावा घेतला पाहिजे. कर्मचाऱ्यांची गुणवत्ता वाढावी त्यांना बढतीच्या संधी मिळाव्यात या हेतूने हे करण्यात यावे. हा विषय पूर्ण विवेकाने हाताळण्यात यावा.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.)**

✽✽✽✽✽

## निवेदिता महिला सोसायटीचा मदतीचा हात

**नवरगाव –** धामण गावातील अग्नितांडवात नुकसान झालेल्या कुटुबियांना निवेदिता महिला सोसायटीच्या वतीने तातडीने मदत देण्यात आली आहे. त्यामध्ये आवश्यक तो किराणा, तसेच आवश्यक वस्तू देण्यात आल्या. या दुर्घटनेत किमान २५ ते ३० कुटुंबियाची घरे जळाली आहेत.

# मानवी जीवनातला अविभाज्य घटक - सहकार

एखादे काम एका व्यक्तीने करणे आणि अनेकांनी त्याला हातभार लावणे, यामध्ये फरक असतो. काही कामे एकाच व्यक्तीची असतात. पण, इतर त्याचे अनुकरण करतात आणि त्याचाही विस्तार सहज होतो. त्याचा इथे संबंध काय असे वाटेल. तर सहकार हा एकाच व्यक्तीचा कसा असेल. सह म्हणजे बरोबर, एकीने, संगती, सवे, संग, एकत्र, समवेत, सोबती असेच काही. म्हणजे जे एकापेक्षा अधिक लोक एकाच कामाला हात लावतात ते सह केलेले कार्य असते. त्याला साहाय्य, मदत, भागीदार, सहभाग, परस्पर साहाय्याने, सहकार्य, सहयोग, एकत्रित प्रयत्न करणे, सांघिक कार्य असेही संबोधिले जाते. तिथून सहकारी शब्द आला. सहकार म्हणजे 'Cooperation' त्यातून सहकारी शब्द झाला 'Colleague.'



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

'६ जुलै २०२१' रोजी 'केंद्रीय सहकार मंत्रालय'ची स्थापना झाली. सहकार शब्दाला आधार मिळाला. त्याचे महत्त्व जाणून त्याचा विस्तार केलाच पाहिजे यासाठी काहीतरी करताना प्रथमच देशात सहकार मंत्रालय एक खंबीर पाठिंबा म्हणून सक्षमपणे उभे राहिले. सहकार क्षेत्रास गतिमानता लाभली, म्हणायला हरकत नसावी. कोणीतरी पाठीराखा असला की सुधार होतो. सहकार सुधारला की आपोआप त्याच्याशी संलग्न असलेला समाज सुधारतो, त्यांचा दर्जा उंचावतो, असे करता करता एखादा समाज चांगला सक्षम होतो. त्या खेड्याचा कायापालट होऊन ते गाव समृद्ध होऊ लागते. त्याचा स्वीकार केला गेला आणि 'सहकार से समृद्धी' : 'सहकारातून समृद्धी' हे सहकारी मंत्रालयाला ब्रीदवाक्य बहाल केले, घोषित केले. विकासात्मक दृष्टिकोन वास्तवात उतरवताना सहकाराची प्रचंड व्याप्ती, विस्तार, ताकद जाणवली. पूर्वीच्या कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या व्यवसायातील सहकाराशी संबंधित विद्यमान नोंदी हस्तांतरित करण्यात आल्या.

सहकारी बँका लोकशाही तत्त्वावर चालणाऱ्या अर्थव्यवस्थेतील संघटना आहेत. एखाद्या गावातील राहणारे काही लोक एकत्र आले, सर्वांना आर्थिक सुविधा देण्यासाठी काहीतरी विचारविनिमय झाला आणि सुविधा उपलब्ध केली गेली. सक्षम व्यक्तीवर विश्वासाने त्याची जबाबदारी टाकली. काम करता करता 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' हे ब्रीदवाक्य सहकार क्षेत्राने स्वीकारले. भारतीय रिझर्व्ह बँक आणि सहकार मंत्रालय एकत्रितरीत्या सहकार क्षेत्र सांभाळायला लागले. सहकारी बँका ऊर्जित होऊन सक्षम झाल्या, होत आहेत. शिस्त आली आणि सहकारी क्षेत्राचा उत्कर्ष होऊ लागला. नव्या मंत्रालयाची जबाबदारी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या समर्थ नेतृत्वावर सोपवली गेली.

सहकाराच्या वैविध्यात प्रथम पदावर प्रमुख शेती, शेतीउत्पादन, साखर कारखाने, पीक खरेदी-विक्री प्रक्रिया, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, गोदामांची सुविधा, आरोग्य सेवा, पर्यटन इत्यादींचा समावेश येतो. या सर्वांना आर्थिक सहकार्य देऊन, त्यांची कार्यपद्धती विचारातून बदलली गेली. सुधारणा केल्या, क्षमता वाढली, आपोआप दर्जा उंचावला. तसेच शिस्त लावली गेली. नफा वधारला हे वेगळे सांगणे न लागे. रोजगार वाढले तसा पगारही वाढविले गेले. उत्पन्न चांगलेच वरवर जाऊ लागले. विकासाबरोबर तेथील समाजाचे राहणीमान उंचावते, शांती नांदू लागते आणि आनंद होतो, म्हणजेच समृद्धी आली. त्यात भर घालीत आहेत ग्रामीण स्टार्टअप्स. कौशल्य विकास योजना, मेक इन इंडिया, मुद्रा योजना यांनी प्रगतीचा दर्जा उंचावला. २०२३ मध्ये आलेल्या विश्वकर्मा योजनेने तर आधीच्या १२ बलुतेदारांची संख्या १८ करून खास त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी मोफत व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण देऊ केले. शिवाय अनुदान देखील दिले. त्या त्या व्यक्तीच्या व्यवसायासाठी लागणारी औजारे घ्यायला एकरकमी मदत दिली. कर्ज उपलब्ध करून दिले. त्याचा फायदा घ्यावा आणि आपल्या कामाचा दर्जा सुधारल्यास नक्कीच उत्पन्न बरोबर उमेद वाढीस लागते. हे लक्षात घेऊन कार्यरत व्हावे.

यासाठी अधिकृत वेबसाइट : pmvishwakarma.gov.in आहे. इथे जाऊन 'पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना' पर्यायावर क्लिक करून प्रवेश अर्ज भरायचा असतो. काही कागदपत्रे जोडावी लागतात. अर्ज पाठवल्यावर त्यावर काम करून संपर्क होतो आणि पुढे प्रशिक्षणासाठी जाता येते. सचोटी, प्रामाणिकपणा, माणुसकी अशा मानवी मूल्यांची बूज राखून व्यवसायवृद्धी शिक्षण घेतले जाते. या योजनेचा फायदा सर्वांनी अवश्य घ्यावा. साहाय्य करायला सरकार सक्षम आणि तत्पर आहे. शेवटी स्वत: हातपाय हलवल्याशिवाय प्रगती होत नाही. आपला उद्धार करून घेणे प्रत्येकाच्या हातात आहे. करेल तो तरेल, हेही लक्षात ठेवावे. तूर्तास इतकेच इथे पुरे करते.


**- वंदना धर्माधिकारी, मोबाइल - ९८९०६ २३९१५**

**ईमेल** - vandana10dyahoo.co.in


*****

## सहकारी बँका, पतसंस्था कर्ज वसुलीसाठी येणाऱ्या समस्यांवरील चर्चासत्र यशस्वी

**मुंबई** - सहकार क्षेत्रातील बँका व पतसंस्था कर्ज वसुलीसाठी येणाऱ्या अडचणी समस्या या विषयावर सहकार भारतीच्या वतीने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. जनसेवा सहकारी बँक यांच्या बोरिवली येथील मुख्य कार्यालयात, अध्यक्ष ॲड. जे. पी. मिश्रा यांच्या उपस्थितीत प्रतिनिधींनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

जनसेवा सहकारी बँकेचे संचालक, तसेच वसुली अधिकारी, सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे वसुली अधिकारी, मालाड सहकारी बँकेचे वसुली विभाग खाते प्रमुख, जनकल्याण सहकारी बँकेचे निवृत्त वसुली अधिकारी, सहकार भारती प्रशिक्षण विभाग अधिकारी, लोकशांती पतसंस्थेचे वसुली अधिकारी, तज्ञ-वसुली विभागाचे रंगनाथ वरिष्ठ अभियोक्ता विषयावर चर्चासत्र झाले.

## हस्ती को-ऑप. बँकेचा डिजिटल उपक्रम सुरू

**धुळे, दोंडाईचा** - येथील हस्ती को-ऑप. बँकेच्या वतीने नुकताच डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सहकार महर्षी स्व. कांतीलालजी हस्तीमलजी जैन यांच्या ८व्या पुण्यतिथिनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी बँकेच्या क्यूआर कोडचे उद्घाटन करण्यात आले.

बँकेचे अध्यक्ष कैलास जैन यांनी बँकेच्या आजवरच्या वाटचालीची माहिती सांगितली. तसेच आगामी योजनाची माहिती सांगितली. बँक उपाध्यक्ष संजय दुग्गड तसेच संचालक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या शिक्रापूर शाखेचे स्थलांतर

**पुणे** - पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या शिक्रापूर शाखेचे नुकतेच स्थलांतर करण्यात आले आहे. बँकेचे अध्यक्ष कैलास कोंद्रे, तसेच संचालक यावेळी उपस्थित होते. उपाध्यक्ष साहेबराव लोणकर, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष स्मिता लडकत आदि उपस्थित होते.

## सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणार

**पुणे –** सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी भविष्याची गरज लक्षात घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने पुढाकार घेतला आहे. याबाबत एमसीडीसी आणि रायगड जिल्हा सहकारी विपणन फेडरेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे.

प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक ती पायाभूत सुविधा प्रशिक्षण घेणाऱ्यांची नोंदणी, स्थानिक समन्वय, तांत्रिक मार्गदर्शन, प्रमाणपत्र व्यवस्था, संस्थात्मक क्षमता विकास याबाबत व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहिती एमसीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश तिटकारे यांनी सांगितले.

दैनंदिन कामकाजात या तंत्रज्ञानाचा निश्चितच उपयोग होणार आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामध्ये ७० टक्के जागा स्थानिक उमेदवारांसाठी

**पुणे –** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या पदभरती प्रक्रियेत यापुढील काळात स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याचा निर्णय राजी शासनाणे घेतला आहे. त्यानुसार बँकेतील ७० टक्के जागा त्या त्या जिल्ह्यातील उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत तर उर्वरित ३० टक्के जागा आणि जिल्ह्यातील उमेदवार यांच्यासाठी असणार आहेत.

अन्य जिल्ह्यातील जागा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यास त्या जागा स्थानिक स्तरावर भरता येणार आहेत. पणन, सहकार, वस्त्रोद्योग विभागाने याबाबतचा निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये पदभरती करताना स्थानिक उमेदवार यांना प्राधान्य देण्यात यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## व्हीसीएएनच्या आधुनिक मुख्य कार्यालयाचे उद्घाटन

**पुणे –** भारत देश हा सक्षम, स्वावलंबी आणि प्रगतिशील अर्थव्यवस्था असून भविष्यात देशाची वेगाने प्रगती होईल असा विश्वास आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी येथील व्हीसीएएनच्या आधुनिक मुख्य कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी त्यांनी सध्याची आर्थिक परिस्थिती, जागतिक घडामोडी, महागाई आणि देशाची मजबूत आर्थिक व्यवस्था यावर सविस्तर विवेचन केले. यावेळी फर्मचे व्यवस्थापकीय संचालक सीए महेश चांडक, संचालक सीए विपुल पटेल उपस्थित होते. मुख्य कार्यक्रमानंतर उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली. त्याचे नियोजन पीयुष चांडक यांनी तर सूत्रसंचालन प्राची जोशी आणि पार्थ जोशी यांनी केले. चंद्रकांत कुमावत यांनी आभार मानले.

## पुणे जिल्हा परिषद सेवक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी नितिन शिर्के

**पुणे –** पुणे जिल्हा परिषद सेवक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी नितिन शिर्के यांची तर उपाध्यक्षपदी हीना तांबोळी यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या नूतन संचालकांची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून दिगंबर हौसारे यांनी काम पाहिले.

पुणे जिल्हा परिषद सेवक पतसंस्थेच्या विकासासाठी सदस्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि आर्थिक शिस्त सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या;
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) - ९४०३० ८०७५१**
**श्री. उदय पेंडसे (संचालक) - ९८६९० ३४६६२**

**✻ प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई-मेल –** sahakarprashikshan@gmail.com

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

वारसा विश्वासाचा

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | फोन : 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# अमृत वर्षा

## पुनर्गुंतवणूक ठेव योजना

6.60%* योजनेचा सामान्य व्याजदर

7.10%* जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर

गुंतवणूक कालावधी 444 दिवस

अंतिम तारीख - 31 मार्च 2027 पर्यंत



**डॉ. नितीन खर्चे**
अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला**
उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

- संचालक -

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |

| कोकण विभाग | | |
|---|---|---|
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |

| मराठवाडा विभाग | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |

| विदर्भ विभाग | | |
|---|---|---|
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | बँकिंग साक्षरता | ३५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

*बिना सहकार, नही उध्दार !!*

# व्हि.पी.के.पतसंस्था

## कै.व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या.सिंधी

* रजि नं. NND/BKR/BNK/0/1360-2002
* ISO 9001-2015 नामांकन मिळालेली संस्था

**मुख्य कार्यालय :** कृषी उत्पन्न बाजार समिती समोर, नविन मोंढा कमान नं.२, नांदेड.
मो. ७२६३०१२३७० E-mail : vpkho.nanded@gmail.com

## *नांदेड जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्था*

## रौप्य महोत्सव वर्ष

*कार्यक्षेत्र : नांदेड* | *अधिकृत भागभांडवल : १५ कोटी*

भागधारक : ५०५६१ | *एकूण शाखा : २०* | *नियोजित शाखा : ९*

### सांपत्तिक स्थिती ३१.०३.२०२६

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल : | ५२५.७८ |
| एकूण ठेवी : | ३६४३२.६१ |
| कर्जे : | २३४४६.२६ |
| एकूण व्यवसाय : | ५९८७८.८७ |
| गुंतवणूक : | ११८७३.४८ |
| सी. डी. रेशो : | ६४:३५% |

**संकल्प**
२०२६-२७
८५० कोटी
आपल्याच
सहकार्याने...!

### ठेवीवरील आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ७.००% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते १२ महिने | ९.००% |
| १२ महिने १ दिवस ते २४ महिने | १०.००% |

ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, अनाथ मुली मुले व दिव्यांगासाठी ठेवीवर ०.५०% ज्यादा व्याजदर

### संस्थेची ठळक वैशिष्ट्ये :

* बँको पुरस्कार प्राप्त २०२३-२०२४
* नियमित ऑडिट वर्ग 'अ'
* कर्जवसुली प्रमाण ९८%
* एन.पी.ए. (१% पेक्षा कमी)
* विविध सामाजिक उपक्रमात सहभाग
* अनुभवी व प्रशिक्षित कर्मचारी वृंद
* तत्पर व विनम्र सेवा
* कोअर बँकिंग प्रणाली
* आरटीजीएस व एनईएफटी सुविधा
* सर्व शाखेत लॉकर सुविधा
* सुलभ व तत्पर ग्राहकभिमुख कर्जसेवा
* ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग सभासदांना ठेवीवर आकर्षक व्याज
* विजबील भरणा केंद्र

### ठेव योजना

- विशेष मुदत ठेव योजना
- मासिक व्याज ठेव योजना
- आर.डी. लखपती ठेव योजना
- धनवर्धिनी ठेव योजना (दाम दुप्पट ठेव)
- दैनिक बचत ठेव योजना

### कर्ज योजना

- सोने तारण कर्ज
- धान्य तारण कर्ज
- व्यवसाय कर्ज
- वैयक्तिक कर्ज
- महिला बचत गट कर्ज



* संस्थापक अध्यक्ष *
श्री मारोतराव व्यंकटराव पा.कवळे
(गुरुजी) सिंधीकर



माधवराव पा.बोडके – उपाध्यक्ष
प्रभाकर पा.पुयड – संचालक
गणेशराव पा.ससे – संचालक
मारोतराव किनेवाड – संचालक
के.वाय.रॅपनवाड – संचालक
अनिलअप्पा काचावार – संचालक



अहेमदबेग रहिमबेग – संचालक
संभाजी वैनवाड – संचालक
सौ.सागरबाई कवळे – संचालिका
सौ.क्रांतीताई नादरे – संचालिका
महादेव पटणे – तज्ञ संचालक
अनिलजी दर्डा – तज्ञ संचालक
नागनाथराव पांचाळ – सचिव

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको ‘बुक’ देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला ‘सहकार महर्षी’ ग्रंथ देऊ या!**

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

**Our Certificates**

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**



सोलर लोनची साथ, गृह कर्जासोबत नवा विश्वास,
आता वाढत्या वीज बिलावर करा मात !
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी 2.0) अंतर्गत सबसीडीस पात्र
आपले गृह स्वप्न साकार करणं आता होईल सोपं !
गृहकर्ज व्याजदर
7.90%*
पासून पुढे
(सिबिल आधारित व्याजदर)
गृहकर्ज घेतलेस रुफटॉप सोलर पॅनेल कर्ज व्याजदरसुद्धा
7.90%*
(सिबिल आधारित व्याजदर)
पीएम सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत भारत सरकार सबसिडीस पात्र
नियम व अटी लागू
सांगली अर्बन बँक
कार लोन
8.35%*
पासून पुढे
(सिबिल आधारित व्याजदर)
कार लोनवर व्याजदर कमी, आनंदाची शंभर टक्के हमी !
नियम व अटी लागू
Since 1935
SUB
SUB का साथ, आपका विकास
सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली
(शेड्युल्ड को-ऑप. बँक)
प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) २३७६२३६ /३७/३८
मोबाईल : ७८८८००९७१८
अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.




स्थापना: 1972
'अर्थ' सार्थ करणारी बँक
दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे
The Vishweshwar Sahakari Bank Ltd., Pune
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
Multi-State Scheduled Bank
सोलर पॅनल कर्ज
LOWER ROI
गृह कर्ज
LOWER ROI
वाहन कर्ज
LOWER ROI
शिक्षण कर्ज
LOWER ROI
RTGS, NEFT, ABB, Mobile Banking, QR-Code, E-Payments, ATM-Cum Debit Card/POS,
Safe Deposit Lockers, CTS/NACH/ACH/ECS, General, Life & Health Insurance, Mutual Funds
Service and Net Banking Services Available
हेमंत वऱ्हाडपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी
राजेंद्र मिरजे
उपाध्यक्ष
अनिल गाडवे
अध्यक्ष
आमच्या शाखा :
Head Office: 471/472, Market Yard, Gultekadi, Pune 411 037 | Customer Care: +91 98819 09700 | Toll Free: 1800 890 8474


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
Empowering Every Student's Dream
Hassle-Free Education Loans
Smart Mobile Banking
RuPay Debit Card Advantages
Education Loan
Account Overview
0221457463512
RuPay DEBIT
Banking
Payment
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/06/2026) Posting on 07/06/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

